# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २४/०१/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २४/०१/२००७ रोजी सभा सुचना क्र. २६ दि. १९/०१/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १२) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |

**मा. सभापती सो :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या महानगरपालिका अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभा सुरु करण्यास मी मा. सचिव साहेबांना पुढील आदेश देत आहे.

(नगरसचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, मागच्या सभेत दोन - तीन मुद्दयांनवर ठेवलेली होती ती त्यावर चर्चा झालेली नव्हती. आपले अधिकारी आलेले नाहीत. मागच्या वेळेला कॅन्टीनचा विषय काढलेला होता. कॅन्टीन आता चालुआहे की बंद आहे आपल्याला कॅन्टीनचे भाडे मिळते की, नाही. आपले कॅन्टिनचे भाडे बाकी आहे. याबाबतची माहिती सबंधिंत विभागाकडुन मिळेल का?

**हंसुकूमार पांडे :-**

पाणी पुरवठ्याच्या बाबतीत माझा प्रश्न आहे। हर साल अपने को लगता हे की हम लोग पानी पुरवठा मे लॉस खाते है। लेकीन मेरे हिसाब के अनुसार अपने पानी पुरवठा में अपने को अच्छा प्रॉफिट है। लेकीन पानी पुरवठा में हरसाल लॉस है। ऐसा क्यों दिखाया जाता है? अपने को ८६ एम. एल. डी पानी आता है। इसमे हम लोग को टेक्निक्ली आलाउड नही है। फिर भी इसमे १५ टक्के एम. एल. डी पानी वेस्टेज ही पकडते है। उसके बाद में ७४ एम. एल.डी पानी बचता है। जिसमे ४ एम. एल. डी पानी हमलोग इंडस्ट्रीज वालो को देते है। और बाकी का ७९ एम. एल. डी पानी रेसिडेन्स को देते है। हमारा परचेस ४ रू. है और सेल ७ रु. से है। और २८ रु. से कमर्शियल है। अपना टँकर का सेल ३२ रु. है। उसमें भी हमलोग पानी में लॉस करते है। तो उसका कारण क्या है?

**शशिकांत भोईर :-**

लॉस खाते है।

**हंसुकूमार पांडे :-**

लॉस खाते है, तो उसका कारण क्या है।

**मा. सभापती सो :-**

ठिक है। अपनी मिटींग खत्म होने पर हम उसपर चर्चा करेंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

लेकीन साहब में क्या बोलता हुँ। हर समय हम कहते है, की मिटींग के बाद इस विषय पर चर्चा करेगें। पर चर्चा होती नही। मिटींग होने के बाद सब उठकर चले जाते है।

**मा. सभापती सो. :-**

हम इसपर चर्चा करेंगे। क्यो नही करेंगे? इसी मिटींग के बाद हम चर्चा करेंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

चर्चा करेंगे पर इसपर कोई निर्णय निकलता है।

**मा. सभापती सो :-**

चर्चा करेंगे ना। क्यों नही करेंगे? उसका खुलासा करेंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

अगर पानी पुरवठा लॉस में है। तो मैं मा. स्थायी समिती से मागणी करता हुं की पानी पुरवठा विभाग मुझे दे, दो। मैं उसको प्रोफिट मे लाके दिखाता हुँ।

**मा. सभापती सो :-**

मै वही बता रहा हुँ मिटींग खत्म होने दो। उसपर हम चर्चा करेंगे।

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १७५ चे वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

ठराव क्र. १२३ हा ठराव मांडलेला होता. हा ठराव मांडुन ३ महिने झालेले आहे. तर त्यावर खुलासा करावा की डोरमॅटल डिरेक्टर आणुन बसवलेले आहे की, नाही.

**मा. सभापती :-**

याच्यावर खुलासा कोण करणार आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, श्री. अजित पाटील साहेबांना बोलवावे?

**दिपक खांबित :-**

मेटल डिरेक्टरचे टेन्डर मागवुन झाले आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

ते टेन्डर केव्हा मागवलेले आहे?

**श्री. सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की या मेटल डिरेक्टर बद्दल ज्या निवीदा मागवण्यात आल्या होत्या. त्या निवीदा आता आपण प्रथमतः तांत्रिक लिफाफे उघडलेले आहोत. परंतु त्यातले जे विक्रेते आहेत ते अधिकृत विक्रेते असल्याची कागदपत्रे त्यांनी अजुन सादर केलेली नाहीत म्हणुन त्या स्तरावरती त्या निवीदा प्रंलबीत आहेत पण आपण त्यांना एक पत्र दिलेले आहे की, तुम्ही त्याचे अधिकृत पुरावे दाखल करावेत ते आल्यानंतर त्यांचा ‘ब ’ लिफाफा उघडला जाईल आणि जो काही न्युनतमचा दर असेल त्याला आपण ही निवीदा देउन त्वरीत वर्ग करुन घेणार आहोत.

**जेन्वी आल्मेडा :-**

तरी सुध्दा अजुन याला किती कालावधी लागेल?

**श्री. सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक ) :-**

जो निवीदाकार आहे त्या निवीदाकाराने अधिकृत असल्याचा पुरावा दाखल केल्यानंतर आपण १० दिवसाच्या आत त्याला वर्क ऑर्डर देवु शकतो.

**जेन्वी आल्मेडा :-**

म्हणजे काय? चार - पाच महिने ठराव असे पेंडीग राहिले तर कामे कशी व्हायची? हे काम लवकरांत लवकर करुन घ्या.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा यांनी प्रकरण क्र. १७५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो:-**

सदर ठरावास मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १७५ :-**

दि. १६/१०/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. :-**

दि. १६/१०/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, दुसरा एक असा विषय आहे की, अतिक्रमण विभाग आणि परवाना विभाग या दोघांचे को-ऑर्डिनेशन अजिबात नाही. अतिक्रमण विभागानी स्टॉलचे परवाने कॅन्सल करण्यासाठी परवाने विभागाला दिले परवाने विभागाने त्या स्टॉलचे परवाने कॅन्सल केले. आता अतिक्रमण विभागाचे म्हणणे असे आहे की परवाना विभाग ते उचलणार? आणि परवाना विभागाचे म्हणणे आहे की अतिक्रमण विभाग ते उचलणार? तर आता ॲक्च्युली स्टॉल कोण उचलणार ज्या स्टॉलचे परवाने आपण रद्द केलेले आहेत ते स्टॉल कोण उचलणार? अतिक्रमण विभाग उचलणार की परवाना विभाग उचलणार? याच्यावर तुम्ही त्यांना आदेश द्या. कारण की, ऑलरेडी परवाने कॅन्सल केलेले आहेत. आणि अतिक्रमण विभागाचे म्हणणे आहे की, जोपर्यंत आम्हाला क्लिअर इन्स्ट्रक्शन नाही तोपर्यंत आम्ही उचलणार नाही.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड) :-**

परवाने विभागाने परवाने रद्द केलेल्या स्टॉलची यादी अतिक्रमण विभागाकडे द्यावी आणि यादीप्रमाणे अतिक्रमण विभागाने कार्यवाही करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, या गोष्टीला भरपूर वेळ झाला आहे. परवाने रद्दकरुन आज ते ८ ते १० दिवस होउुन गेले पण अजुनपर्यंत त्याच्यावर कार्यवाही झालेली नाही. श्री. अजित पाटील साहेब, आता साहेबांनी तुम्हाला मा. स्थायी समितीसमोर इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत. तर तुम्ही त्यावर ॲक्शन घेतली पाहिजे.

**अजित पाटील :-**

परवाना रद्द केल्याबद्दलची इन्फॉर्मेशन आमच्याकडे आलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आज या कामाला १० दिवस होउुन गेलेले आहेत.

**अजित पाटील :-**

आमच्याकडे परवाना रद्द करण्याची इन्फॉर्मेशन आलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, थर्ड फ्लोअर ते फर्स्ट फ्लोअरला एवढे दिवस लागतात. म्हणजे मिरा- भाईंदरचा विकास करण्याचे अधिकाऱ्यांनी ठरवलेले नाही का? आज साफ सफाई करायची नाही का?

**मा. सभापती सो. :-**

मी काहीच म्हणणार नाही. मला जर तुमच्याकडून आदेश मिळाले तर मी करिन. त्याचे एवढे म्हणणे एकच आहे. मला काहिच माहित नाही. ते काय करतात ते मला काहिच समजत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पाटील साहेब, उप आयुक्तसाहेबांनी सांगितले की मी तुमच्या डिपार्टमेंटला इन्फॉर्मेशन पाठवलेली आहे. ती इन्फॉर्मेशन कुठे लिक झाली ते काही आम्हाला माहित नाही. परंतु, तुम्ही इमिजिएट कारवाई करणार की नाही ते सांगा.

**अजित पाटील :-**

एकदा आदेश आल्यावर कार्यवाही करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आता आदेशाची काय गरज आहे? साहेबांनी तुम्हाला क्लिअरकट सांगितलेले आहे.

**अजित पाटील :-**

आमच्याकडे परवाने रद्द करावे अशी कॉपी आलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही अशी इम्पॉर्टंट वस्तू साहेबांना का देत नाही. साहेब, हे चुकीचे आहे. तुम्हाला सुद्धा शहराचे पडले पाहिजे ना. आज तुम्ही मिरा-भाईंदर शहरामध्ये राहता. आज तुम्हाला टॅक्स विभागाकडून पगार मिळतो. आम्ही तुम्हाला सहकार्य करतो. ॲक्च्युअली अशी परिस्थिती आहे की जे लोक प्रतिनिधी आहेत ते अनधिकृत बांधकाम, स्टॉल यांना प्रिव्हेन्ट करतात. आणि आम्ही मागणी करतो. ते तुम्ही डिमॉलीश करा. त्याची साफसफाई करा. आम्ही तुमच्या मागे उभे रहातो. मग तुम्ही का घाबरता? तुम्हाला एवढे डॅशिंग आयुक्त भेटले. ज्यांनी शहरं अगदी साफ करुन टाकली. तसे तुम्हाला मिरा - भाईंदर साफ करता येत नाही. आज श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी अख्खा भाईंदर (वेस्ट) चा स्टेशनरोड साफ केला. तुम्हाला एवढे साफ

करता येत नाही. आम्ही तुंम्हाला अभिनंदन करतो. तुम्हाला प्रमोट करतो. मग तुम्हाला हे का जमत नाही. साहेब, जर तुम्हाला कोणाचाही आदेश आला तर तुम्ही क्लिअर कट सांगा. आज स्टँडींग समोर तुम्ही विषय घेतला आहे आणि आम्ही सुद्धा विषय घेतलेला आहे. आज तुम्ही आंम्हाला सांगितले की तुम्ही उद्या साफ करणार आहात. आणि उद्या जर तुंम्हाला कोणी सांगितले तर ते चुकीचे आहे. तुम्ही आत्ताच ॲक्शन घ्या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, मागच्या स्टँडींगमध्येसुद्धा हा विषय आला होता त्यावेळेला सभापती साहेबांनी रुलिंगसुद्धा दिलेले होते कि, शहरामध्ये असणाऱ्या अनधिकृत ज्या टपऱ्या आहेत त्या उचलण्याच्या संदर्भात तर तशी बऱ्याचशा ठिकाणी कारवाई झालेली नाही. या जोडीला त्वरित ती कार्यवाही करुन मिरा-भाईंदर विकासाच्या दृष्टीने एक पुरक पाउुल टाकते आणि एका बाजुला या टपऱ्यांचे गटारावर रस्त्याच्या मधोमध असे सगळे गटई कामगार किंवा चर्मकार अशा पद्धतीने टपऱ्या टपऱ्या लागतात का? परत एकदा उचलून मिरा-भाईंदर स्वच्छ आणि क्लिन करावे अशी मा. सभापती साहेबांना आणि मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

या टपऱ्यांच्या संदर्भात मी एक खुलासा करु इच्छितो की, टपऱ्यांच्या बाबतीत शासनाचे जे काही धोरण आहे. त्या धोरणाप्रमाणे आपण याठिकाणी परवानगी देतो. परंतु, माझ्या असे लक्षात आले की, एका-एका जो अर्जदार आहे. त्याच्या अर्जावर तीन-तीन, चार-चार, पाच-पाच टपऱ्या आहेत. आपल्या परवाना विभागाकडून अशा ज्या प्रकारच्या त्यांना परवानग्या दिल्या जातील. एक तर ॲफिडेव्हिट लिहून घ्यायला पाहिजे की, माझी अन्य कुठेही टपरी नाही. किंवा एकालाच फक्त परवानगी द्यायला पाहिजे. एकाच कुटूंबमध्ये, एकाच रेशनकार्डवरती, एकाच कुटुंबातील अनेक रेशनकार्ड असतात. त्याच्यावर त्यांना परवानग्या दिल्या जातात. ही जी पद्धत आहे. ती चुकीची पद्धत आहे. ती बंद करण्यासाठी परवाना विभागाला मी तसे आदेश देतो आणि परवाना विभागानेसुद्धा अशाप्रकारची खात्री करावी की जेणेकरून डयुप्लिकेशन होणार नाही.

**रतन पाटील :-**

महापालिकेसमोर ज्या टपऱ्या आहेत. त्यांचे मालक विरारला राहतात. आणि त्यांच्या टपऱ्या इकडे आहे. मिरा-भाईंदर मधली ही परिस्थिती आहे आणि त्या चालवतात दुसरे प्रत्येक टपऱ्या दुसऱ्याला चालवायला भाड्याने दिलेल्या आहेत.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

याबाबतीत मी परवाना विभागाला निर्देश देतो की, ज्या ज्या ठिकाणी अशाप्रकारच्या परवानग्या दिलेल्या आहेत. तेच त्या ठिकाणी टपरी चालवतील याची दक्षता घ्यावी. त्यांनी जर इतरांना चालवायला दिली असेल तर ती टपरी अनधिकृत समजून त्यावर कार्यवाही करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. पण त्यात एक ॲडीशन करा की कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष जाऊन खात्री करावी सदरहू व्यवसाय तोच मालक करतो की त्याने भाडयाने दिलेले आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

यापूर्वीच मी अशाप्रकारचे निर्देश संबंधित विभागाला दिलेले आहेत की तुम्ही त्याचा सर्व्हे करा आणि सर्व्हेचा रिपोर्ट ताबोडतोब माझ्याकडे द्या.

**रतन पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जे स्थानिक अपंगांना ज्या काही तक्रार द्यायची असेल ती स्थानिकांना देण्याची कृपा करावी.

**मा. सभापती सो. :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे.

**शशिकांत भोईर :-**

अन्यथा मुंबईवरुन फेरिवाले इथे येतील आणि आपल्या शहरामध्ये गर्दी करुन बसतील. यासाठी फक्त स्थानिक फेरिवाल्यांनाच टपऱ्यांची सोय करुन द्या.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही फक्त स्थानिक फेरिवाल्यांनाच टपऱ्या द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती महोदय हा आपला विषय टपऱ्यांसाठी आहे की पॉलीसी मॅटरसाठी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय फक्त पॉलिसी मॅटरसाठी आहे.

**रोहिदास पाटील :-**

पॉलिसीमॅटरसाठी असेल तर त्यावर व्यवस्थित चर्चा व्हायला पाहिजे ना. या विषयाबाबत सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील सांगणार आणि तुम्ही फक्त ऐकणार असे होता कामा नये. अशाप्रकारे चालणार असेल तर सभागृहाचे कामकाज कसे काय चालणार? आता आमच्याही लक्षात येत चालले आहे. एक तुम्ही इथे नक्की त्याची मर्यादा ठरावा की मा. स्थायी समितीमध्ये ठरले ते तुम्हांला मंजूर नाही. मा. महासभेमध्ये

ठरले तेही तुम्हांला मंजूर नाही. काल मा. महापौरांच्या केबिनमध्ये बैठक झाली तुमचे निर्णय झाले. मग महासभा कशासाठी? एक तर पहिले ते रेकॉर्डवरही येवू दे. मा. स्थायी समितीमध्ये स्थायी समितीचे अधिकार आणि महासभेच्या अधिकाराबद्दल मा. आयुक्त साहेबांचे मत काय? कालची बैठक सभेत निर्णय झाला होता की बुधवारची बैठक ती बैठक मंगळवारी लावली आम्ही येऊ शकलो, नाही येऊ शकलो. तोही वादाचा विषय नाही. पण ते बैठकीत झाल्यानंतर कोणाच्या उपस्थितीत कोणते निर्णय झाले? ते निर्णय गटनेत्यांचे असतील तर गटनेत्यांचे शास्त्रशुद्ध निर्णय व्हायला पाहिजेत. तुम्ही माप तयार करुन जर असे सांगाल आम्ही हे कले मंजूर साहेब तर ते तुम्हांला अडचणीचे ठरेल.

**मा. आयुक्त :-**

परवा जी महासभा झाली, त्या महासभेने जे रुलिंग दिलेले होते. त्या रुलिंगप्रमाणे ज्यांना-ज्यांना त्या सेवाज्येष्ठता विषयाच्या बाबतीत सभागृहात बोलले. त्यांना पत्र पाठवून मा. महापौरांची वेळ घेवून आपण त्यांना सांगितले होते की, तुमच्या वेळेप्रमाणे सांगा त्याप्रमाणे आम्ही करु. म्हणून आम्ही काल त्यांना पत्र म्हणून आम्ही काल त्यांना पत्र पाठवले.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही चोवीस तासामध्ये असे पत्र पाठवाल आणि उत्तर मागाल तर तुम्हाला कोणी उत्तर देणार आहे? ती बैठक खरोखरच जर गटनेत्यांची घ्यायची असेल तर गटनेत्यांची एन्ट्री ठेवायला पाहिजे. तुम्ही मॉब तयार करुन निर्णय घ्याल. आम्हाला माहिती नाही असे सांगाल गटनेते यांनी मंजुरी दिली. मग, साहेब, महासभेच्या मोजमापाच्या दृष्टीने महासभेच्या मर्यादा काय? तुम्ही मा. महासभेत आयुक्त म्हणून जेव्हा बसतात. तेव्हा महासभेच्या कामकाजाच्या मर्यादा काय आहेत? महासभेत जे ठरलेले लिहिल्यावर परत गटनेत्यांच्या बैठकीमध्ये निर्णय करुन त्याला पुन्हा फिरवायचे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो. ) :-**

महासभेमध्ये निर्णय झालेला नव्हता महासभेमध्ये जेव्हा चर्चा झाली तेव्हा चर्चेमध्ये हस्तक्षेप करुन मा. महापौरांनी तेंव्हा डायसवरुन जे निर्देश दिले त्या निर्देशप्रमाणे कालची बैठक आयोजित केलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ती बैठक बुधवारची होती.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

सन्मा. श्री. रोहीदास पाटील साहेब, बुधवारची जी बैठक होती ती बैठक एस.ई.झेड. साठी बोलाविली होती.

**रोहिदास पाटील :-**

या सगळ्या विषयांवर बुधवारी चर्चा होईल असे मा. महापौर बोललेले आम्हाला आठवते आम्ही त्यामध्ये वाद घालत नाही. परंतु, जर त्या बैठकीत त्याला शासन असेल आणि ती बैठक तुम्ही मान्य करत असाल तर तुम्ही त्याच्यात अडचणीत याल आम्ही पण अडचणीत येवू ज्या गोष्टीसाठी आम्ही संमती दिली आम्ही मान्य केले त्यासाठी आपण अडचणीत येउु.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

मा. महापौरांनी डायसवरुन जे आदेश - निर्देश दिलेले होते त्याच्याप्रमाणे बैठकीचे आयोजन केलेले होते. आणि त्याबैठकीचे आयोजन केलेले होते ते मा. महापौरांना विचारुनच केलेले होत.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांना विचारलेत तरी मा. महासभेत झालेल्या ठरावांवर निर्णय झालेला होता आणि त्याप्रमाणे रुलिंग दिलेले होते. रुलिंग दिल्यानंतर पुन्हा त्याच्यावर चर्चा करायची की?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

ठराव झालेलाच नव्हता चर्चा सुरु होती आणि त्या चर्चेवर मा. महापौरांनी निर्देश दिले होते.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांनी कोणते निर्देश दिलेले होते?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठतेच्या बाबतीमध्ये आणि पदोन्नतीच्या बाबतीत जी चर्चा सभागृहामध्ये चालू होती त्या सभागृहाच्या चर्चेवर मा. महापौरांनी रुलींग दिलेले होते की, माझ्या दालनामध्ये संबंधीत नगरसेवकांची बैठक आयोजित करण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

कोणाची बैठक आयोजित करण्यात येईल? आम्ही तुम्हाला विनंती केलेली होती. त्याच्यात तुमची भुमिका महत्वाची आहे. जे ठरेल त्याच्यामध्ये ज्या पद्धतीने जी कॅटेगरी त्याला लावाल. एक तर गटनेते असतील तर गटनेते निर्णय देतील. नगरसेवक असतील तर महासभा निर्णय घेतील. महासभा सोडून नंतर नगरसेवकांची कशी होईल? जे उपस्थित आहे त्यांनी ठरवले आणि ते सगळ्यांना बंधनकारक राहिले. साहेब, असे कसे होईल?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

या बाबतीमध्ये मी महासभेमध्ये सुध्दा सांगितले होते की, अशाप्रकारचे जे कर्मचाऱ्यांचे प्रश्न असतील सेवाजेष्ठते बद्दल पदोन्नतीच्या बाबतीत असतील तर त्याच्यामध्ये मी एका आठवड्यामध्ये निर्णय घेईन.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, कामकाजाची स्टाईल बदली होत चालली आहे. आणि त्याला जबाबदार तुम्ही राहणार. तुम्ही 'ज' च्या प्रस्ताव आणुन प्रमोशनचे प्रस्ताव आणयला लागले. 'ज' च्या प्रस्तावाला आणुन 'ज' च्या प्रस्तावाला किती महत्व आहे हे नक्की तुम्हाला माहिती आहे. आणि नक्की आम्हांलाही माहिती आहे. आम्ही सगळ्याला हो, म्हणतो याचा अर्थ सगळ्याला हो म्हणतो असे समजुन घेत असाल तर ते आम्हाला अडचणीचे ठरेल.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, 'ज' चा प्रस्ताव आम्ही आणतो असे, जे आपण म्हणता तर 'ज' चा प्रस्ताव आणण्याची कायदेशीर जबाबदारी कोणची आहे? कोणाकडुन अशा प्रकारचे प्रस्ताव येतात? आमच्याकडुन येतात की नगरसेवकान कडुन येतात?

**रोहिदास पाटील :-**

प्रस्ताव कोणाकडुनही आला तरी प्रस्तावाचे स्वरुप काय आहे? हे बघायचे तरी तुमचे काम आहे. त्याच्यावर निवेदन करण्याचे साहेब आयुक्तांचे नक्कीच काम आहे की जरी हा ' ज ' चा प्रस्ताव आला तरी त्याच्यांत असलेला विषय हा कायदेशीर आहे की कायद्याच्या बाहेरचा आहे. या
सभागृहात जरी तो मान्य होण्यासारखा आहे किंवा नाही म्हणजे सभागृहात जरी तो भावनात्मकदृष्टया मान्य झाला तर तो नियमांत बसतो की नाही हे तुम्ही निवेदन करत नाही. त्याच्यावर तुम्ही गप्प भूमिका घेता याचे दोन अर्थ निघतात. नंतर तुम्ही याच्यावर कार्यवाही करत नाही आणि सभागृहाचे त्याबद्दल चे वेगळे मत होते की आम्ही मंजूरी दिली, आम्ही ठरवले आणि मग तुम्ही कार्यवाही करत नाही. म्हणजे तुमची दुहेरी भूमिका होते. त्याशिवाय तुम्ही सांगितले हे नियमांत बसत नाही. तर कोणीही कितीही सांगितले अखेर तो निर्णय मागे घ्यायला लागेल. त्यादिवशी तुम्ही एक ठराव आणला. तुम्ही इथे सांगता ते नियमांमध्ये बसत नाही. आम्ही भावनात्मक ठराव करुन दिला आता आम्ही अंमलबजावणी करणार नाही. आम्ही तुम्हांला सांगतो सोळा जणांपैकी मी एकटा विरोधी बोलून काही फायदा होणार नाही आणि बोलायचेच ठरवले तर सगळेच विरोधी बोलू शकतो हेही खरे आहे. पण जेव्हा तो होणारच असेल ही ठाम भूमिका सांगितली, की या ठरावाची अंमलबजावणी होणार नाही. हे नियमांत बसत नाही. ठिक आहे. मा. सभापती साहेब अस सगळ्यांच्या गळा दाबून तो निर्णय घेवू शकत नाही. मा. सभापती साहेब ते नियमांत बसत नाही असे सांगतात. आम्ही आग्रह केला तेही रुलिंग देतील. पण त्यावेळी तुम्ही अशी संक्षिप्त भूमिका घेता स्पष्ट नाही. मग तो ठराव होवून जातो. आणि अंमलबजावणी झाली की आम्ही तो बघत राहतो. साहेब, तुमच्यात आणि आमच्यात अंतर वाढत चाललेले आहे. सभागृहात म्हणजे मा. महासभेत सुद्धा वाढेल आणि मा. स्थायी समितीमध्ये वाढेल. आता जो तुम्हांला सुर दिसतोय तुम्ही त्याचा अंदाज घ्यायला पाहिजे ही हे कुठेतरी एका बाजूला जाते. त्यापेक्षा नियमानुसार ही तरतुद आहे जर पळवाट असेल तर ही पळवाट आहे आणि जे असेल ते आम्हांला हे रेकॉर्ड आले तरी काही हरकत नाही. आम्ही सरळ हो म्हणतो ना. हेही हो म्हणतात. तेही हो म्हणतात. नसेल त्याला आम्ही हो कुठे म्हणणार? आणि तुम्ही तरी कसे हो म्हणाल? पण ते नसेल तर तुम्ही ठाम सांगा की नाहीच. मी मा. साहेबांना ही विनंती करतो या सभागृहाला ही विनंती करतो की नियमांत बसत नाही हा विषय इथे संपवा. चर्चा भली रिझल्टशिवाय तुम्ही ५-१० मिनिटे करा असे सांगितले तर सोपे पडेल.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यांत यावा.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे संबंधित समितीचा ठराव आहे.

(सन्मा. सदस्या ग्रिटा फॅरो यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण ह्या ज्या स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. त्या आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कला, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आहेत ना.

**मा. सभापती :-**

आपण या स्पर्धा कला, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आहेत.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

या स्पर्धा महापालिकेच्या कला, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या होत्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या इन्व्हीटेशन कार्डवर ‘मिरा भाईंदर स्पोर्टस असोसिएशन’ छापलेले आहे. त्याचा ह्याच्याशी काय संबंध आहे?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

आपण ते आयोजित करणार नाही. आपण ते टेन्डर पध्दतीने करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, याच्यावरुन असाप्रश्न निर्माण होतो की, ‘मिरा भाईंदर स्पोर्टस असोसिएशन’ काय आहे? कुठली संस्था आहे? या संस्थेने अजूनपर्यंत कुठले कार्यक्रम आयोजित केलेले होते?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपण टेन्डर पध्दतीने स्पर्धा आयोजित करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही टेन्डर कॉल केलेले आहेत का?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

आपण त्या पध्दतीने स्पर्धा आयोजित करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, याचा स्पोर्टस असोसिएशनशी काय संबंध आहे? स्पोर्टस असोसिएशनने ते टेन्डर भरलेले आहे का?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

स्पोर्टस असोसिएशनने ते टेन्डर पाठवलेले आहे. या संदर्भामध्ये मी असे सांगु इच्छितो की आपण कला, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती अंतर्गत अशाप्रकारच्या स्पर्धा भरवणार आहोत. या स्पर्धा भरवत असताना त्याच्यासाठी होणारा जो खर्च आहे आणि त्याचे जे काही नियोजन आहे. आपण हे नियोजन करण्यासाठी टेन्डर पध्दतीने टेन्डर कॉल केलेले आहेत. जे टेन्डर येतील त्यांच्या मदतीने आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण अशाप्रकारची स्पर्धा पार पडणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मी स्पोर्टस असोसिएशनबाबत असे सांगु इच्छितो की आज आमचीसुध्दा संस्था आहे. आम्ही आमच्या संस्थेमार्फत कार्यक्रम राबवतो. आमच्या संस्थेलासुध्दा प्राधान्य द्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या निमंत्रण पत्रिकेवर त्या समितीचे नाव असणे आवश्यक आहे.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडलासुध्दा अशी संस्था आहे. आपण त्या संस्थेमार्फतसुध्दा असे कार्यक्रम राबवू शकतो.

**रोहिदास पाटील :-**

अधिकारी सर्व काही समजून कसे चालायला लागले? त्यांची हिम्मत कशी होते? कारण ज्याचे काही लिखाण नाही, ज्याचे काही ॲप्रोच नाही त्याचे नाव घेउन नावाने सर्व काही छापणार, हे करणार आणि मग कोण तरी सदस्य विचारणार असे करायला अधिकाऱ्यांना हिंमत कशी होते. त्यांना कामाची प्रोसिजर माहिती आहे की नाही. ते हे सर्व काही आणूनबुजून करतात की हे अज्ञानात होत आहे. ही लोक इतकी वर्ष काम करुनसुध्दा यांना महापालिकेच्या कामकाजाची कर्तव्याची आणि स्वतःच्या कर्तव्याचीसुध्दा जाणीव नाही का? आपल्या महापालिकेचे एवढे काही लिहून येते की, पेपरला हात लावायला नको अशा पध्दतीने लिखाण यायला लागलेले आहे आणि तरीसुध्दा तुम्हाला हिंमत होते. तुम्ही हे केलेले नियमात केलेले आहे की नाही नसेल तर तुम्ही सभागृहाची माफी मागावी असे मला वाटते. तुम्ही काय कार्यवाही कराल हा नंतरचा विषय आहे. अधिकाऱ्यांनी ही जी कृती केलेली आहे ती योग्य आहे की अयोग्य आहे ते मला सांगा. जर तुम्ही ह्याला समर्थन करित असाल तर मी मा. आयुक्तांनी दिलेल्या कामाचे समर्थन करतो असे सांगा. सगळ्या कामाची हद्द होत चाललेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापती साहब, इसमे रोख इनाम लिखा है। वह रोख इनाम कितना देनेवाले है? ऐसे कुछ मेन्शन नही किया है।

**एस. ए. खान :-**

किती रोख रक्कम देणार आहे? याचा या ठिकाणी उल्लेख केलेला नाही.

**रमेश जैन :-**

इस स्पर्धा के लिये कितना बजेट है?

**रोहिदास पाटील :-**

हमारा पहलेका कितना बजेट है?

**हंसुकुमार पांडे :-**

हमारा पहला रु. ६ लाख ६५ हजारका बजेट है।

**रोहिदास पाटील :-**

मी ह्याला विरोध करित नाही.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की आपल्या महापालिकेच्या ज्या शाळा आहेत. त्या शाळेतील विद्यार्थ्यांना ह्याच्यामध्ये सामील करुन त्यांनासुध्दा या राज्यस्तरिय कराटे स्पर्धेचे प्रशिक्षण द्यावे. आपल्याकडे अशा विद्यार्थ्यांना प्रशिक्षण बघण्याबाबत किंवा त्यांना प्रशिक्षण देण्याबाबत काहीतरी कार्यवाही व्हायला पाहिजे असे मला वाटते. आपण प्रत्येक वेळेला बाहेरची लोक बोलावू नयेत. आपण आपल्या क्षेत्रातील स्पर्धक स्वतः तयार करुया. मग त्यांना स्पर्धा बघता येईल आणि पुढच्या वेळेला अशा घेता येईल अशा पध्दतीने आपण नियोजन करुया.

**मा. सभापती :-**

आम्ही तसे नियोजन करुया.

(सन्मा. सदस्य ------------------- यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

इसके लिए सब लोगोका अनुमोदन है।

**रतन पाटील :-**

तुम्ही या स्पर्धेमध्ये महापालिकेच्या विद्यार्थ्यांना सामील करुन घेणार आहात की नाही? आपण बाहेरच्या लोकांना सामील करुन घ्यायचे आहे. मग आपले विद्यार्थी काय करतील?

**एस. ए. खान :-**

ह्याच्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका शाळामधील विद्यार्थ्यांनासुध्दा सामील करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही खर्चाला मंजुरी देणार आहात का?

**रतन पाटील :-**

हे योग्य नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही खर्चाला मंजुरी दिली तेव्हा कोणाला प्रवेश द्याल ते ठरवले आहे का? सन्मा. सदस्य रतन पाटील आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रवेश द्या असे बोलतात. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून त्यांची गुणवत्ता वाढवा. त्यांना मोका दिला तर ते चुकीचे ठरत नाही.

**एस. ए. खान :-**

महापालिकेच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्या.

**रोहिदास पाटील :-**

समजा, आपण प्रयोग करतो आणि आपण तो प्रयोग आपल्या विद्यार्थ्यांसाठी केला तर योग्य होईल.

**मा. सभापती :-**

आपण सगळ्यांना समाविष्ट करुन घेतलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण खर्च करतो. हा एक वेगळा भाग आहे.

**मा. सभापती :-**

आपली मिरा भाईंदरचीसुध्दा मुले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदरची मुले आहेत हासुध्दा वेगळा भाग आहे.

**मा. सभापती :-**

या स्पर्धेसाठी मिरा भाईंदरची मुले आलेली आहेत. त्या सगळ्यांनी फॉर्म जमा केलेले आहेत. ह्या स्पर्धेमध्ये मिरा भाईंदरची सुध्दा मुले आहेत.

**एस. ए. खान :-**

परंतू, आपण अजूनपर्यंत जाहिरात केलेली नसतानासुध्दा फॉर्म कसे आले? अजूनपर्यंत कोणतीही माहिती नसतानासुध्दा फॉर्म कसे आले?

**जेन्वी अल्मेडा :-**

मी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना स्थानिक लोकांना प्रथम प्राधान्य द्या असे सांगु इच्छिते.

**रोहिदास पाटील :-**

आपण आपल्या महापालिकेच्या शाळांना प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे असे मला वाटते.

**मा. सभापती :-**

आपण आपल्या महापालिकेच्या शाळांना प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. आपण मिरा भाईंदरसाठी प्राधान्य दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी ते सर्व यायला पाहिजे होते. परंतु, आलेले नाही. तुम्ही या ठिकाणी दुरुस्ती करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी केलेल्या सुचनेसहित ठराव मंजुर करण्यांत यावा.

**रमेश जैन :-**

'मिस सुंदरी' कॉम्पीटिशन मिरा भाईंदरमे है क्या?

(सन्मा. सदस्या गीता जैन यांनी सभागृहासमोर प्रकरण क्र. १७६ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गीता जैन :-**

वह लोग मंडप तीन दिन के लिये लगायेंगे।

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्ही कोणत्याही गोष्टीला नाही बोलत नाही. परंतु, त्याचा उद्देश व्यवस्थित सार्थ होत नाही. आपण एका सुंदरीसाठी किती खर्च करायचा आहे? तुम्ही या स्पर्धेसाठी स्थानिक मुलींना घेणार आहोत का?

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला मिस आणि मिसेस दोन्ही घ्यायच्या आहेत का?

**रतन पाटील :-**

आपल्याला फक्त मिस घ्यायच्या आहेत.

**गीता जैन :-**

हम लोग १८ से २५ साल तक लडकीयॉ लेनेवाले है।

**ग्रिटा फॅरो :-**

मिस आणि मिसेस दोन्ही घ्यायच्या आहेत का?

**गीता जैन :-**

ऐसा कुछ नही।

**एस. ए. खान :-**

ह्याच्यामध्ये मिस आणि मिसेस असे लिहलेले आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, ह्याच्यामध्ये तसे लिहलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आम्ही कामकाज चालू देणार नाही. तुम्ही हा पोरखेळ समजता का? आम्ही मा. सभापती साहेब आणि तुम्हाला मान देतो. परंतु, तुम्ही हे किती ईझी घेता? ते ठराव देतात तेव्हा त्यांना काय पाहिजे? ते स्पष्ट लिहता येत नाही का?

**गीता जैन :-**

ठराव मे चार्ज देनेका अलाउड नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

आपको देखने के लिये उलाउड है।

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब तुम्ही त्यांना दिलेला ठराव परिपूर्ण असावा असे बोलू शकता. आता असे सांगाल मिस्टर पण आहेत त्याच्यामध्ये?

**मा. सभापती सो. :-**

मी ठराव परिपुर्ण असावा असा सांगितलेले होते.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्ही बोलत का नाहीत? मी तुम्हाला कामकाजाच्या दृष्टीने सांगतो. तरी तुम्ही समज देउ शकत नाही का?

**मा. आयुक्त :-**

कला, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतीक समितीकडून जो ठराव आलेला आहे. तो ठराव स्थायी समितीने अजेन्ड्यावर घेतलेला आहे. खरे म्हणजे तो ठराव वाचून स्थायी समितीकडून हा प्रस्ताव आलेला आहेत. हे तीन प्रस्ताव एकत्र करून यायला पाहिजे होते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही प्रस्ताव कुठे केला? आपण कला, क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समितीला काही ग्राह्य धरूया. त्यांनी अपुरे दिले, पुर्ण दिले चुकीचे दिले. तरी आपण ते सगळे ग्राह्य धरूया. आपल्या स्थायी समितीसमोर आणतेवेळी कोणाची तरी त्याबाबत नैतिक जबाबदारी होती की नाही. तो प्रस्ताव आणायचा का? त्यांचे काही चुकले असेल असे मी बोलत नाही? परंतु, जर अपुरे असेल तर तर त्यांची समिती नविन आहे. त्याच्या कामकाजाचे माणसांनी लक्ष दिलेले नसेल, आपल्या अधिका-यांनी तो ठराव परिपुर्ण आणायला पाहिजे. शिवाय एकत्र करून आणायला पाहिजे. याची स्वच्छ आणि स्पष्ट टिपणी यायला पाहिजे होती.

**प्रकरण क्र. १७६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती अंतर्गत राज्य स्तरीय क्रिडा, कराटे स्पर्धा आयोजित करणेबाबत. (मा. क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती सभा दि. १६/०१/२००७ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १५, १६, १७)

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात, क्रिडा, समाजकल्याण समिती अंतर्गत मिरा भाईंदर स्पर्धाकांसाठी मिरा भाईंदर मिस, मिसेस सुंदरी स्पर्धा आयोजित करावयाची आहे. सदरची स्पर्धा फेब्रुवारी २००७ या कालावधीमध्ये आयोजित करावयाची आहे. सदरच्या स्पर्धा खालीलप्रमाणे

अ) मिरा भाईंदर मिस, मिसेस सुंदरी स्पर्धा ही स्पर्धा वय वर्षे १८ ते २५ या वयोगटाच्या गटामध्ये भरवावयाच्या आहेत. त्यामध्ये सर्व गटामध्ये प्रत्येकी तीन पारितोषके व एक उत्तेजनार्थ पारितोषिके दयावयाची आहेत. त्यांच्यासाठी वैद्यकीय व्यवस्था, जाहिरात व्यवस्था व पारितोषिक वितरण व शाल, श्रीफळ, फूल, हारतुरे, बॅनर्स, मंडप-३ दिवसांकरिता, साहित्य व स्टेशनरी, प्रसिध्दी, स्टेज व्यवस्था, साऊंड सिस्टीम, फोटोग्राफी व व्हीडीओ शुटिंग, परिक्षक मानधन, सुंदरी मुकूट - ६, रोख पुरस्कार, स्मृती चिन्ह, डिजीटल बोर्ड, व इतर व्यवस्था करावी लागणार आहे. त्यासाठी अंदाजीत रु. ५,००,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी मिरा भाईंदर मिस, मिसेस सुंदरी स्पर्धा आयोजित करणे ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. गिता जैन.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १७७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मी सभापतीसाहेब, मी तुम्हाला अशी विनंती करतो की सदरचे जे प्रकरण आहे. आम्हाला त्याचा अभ्यास करण्यासाठी थोडा अवधी द्यावा आणि प्रकरण पुढच्या स्थायी समितीला घेण्यात यावे.

**मा. आयुक्त सो. :-**

मा. सभापतीसाहेब, मला याबाबत तुमच्या असे निदर्शनास आणून द्यायचे आहे की आपला जो लेखा परिक्षणाचा अहवाल आहे. आपण तो लखा परिक्षणाचा अहवाल स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांना पाठविलेला होता. हा अहवाल पाठवल्यानंतर तोच अहवाल आजच्या दै. लोकमताला प्रसिद्ध झालेला आहे.

**मा. सभापती सो. :-**

तो अहवाल पेपरला प्रसिद्ध कसा झाला?

**मा. आयुक्त सो. :-**

आपली त्या अहवालावर चर्चा व्हायची आहे. ह्या अहवालावर स्थायी समितला चर्चा होणे आवश्यक असतानासुद्धा अशाप्रकारचा अहवाल कसा केला?

**रतन पाटील :-**

आपण जी चर्चा करतो ती लगेच बाहेर जाते यासंबंधी कार्यवाही करू. आपली ही जी चालू चर्चा आहे तीसुद्धा बाहेर जाते. आपण एखाद्या विरूद्ध बोललो तरी बाहेर जाते. आपली प्रचार यंत्रणा खुप फास्ट आहे असे मला वाटते.

**मा. आयुक्त सो. :-**

आपली स्थायी समिती सार्वभौम आहे. ती कायद्याने गठीत झालेली आहे. तिचे जे अधिकार आहेत. परंतु, स्थायी समितीमध्ये अशाप्रकारच्या एखाद्या विषयावर चर्चा होत नाही. ते लगेच बाहेर जाते. वर्तमानपत्रामध्ये अशाप्रकारची बातमी जात असेल.

**मा. सभापती सो. :-**

ती चुकीची गोष्ट आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

फक्त १६ सदस्यांना लेखा परिक्षण अहवाल कॉपी दिलेली होती की पदाधिका-यांना सुद्धा या अहवालाची कॉपी दिलेली होती का?

**मा. सभापती सो. :-**

आपण फक्त सोळा सदस्यांना लेखा परिक्षण अहवाल दिलेला आहे.

**गिता जैन :-**

आपण १६ सदस्यांना अहवाल दिलेला आहे ते बरोबर आहे. परंतु, त्या अहवालाची प्रिन्ट आउट असेल ना.

**नगरसचिव :-**

आपण १६ सदस्यांना लेखा परिक्षण अहवाल दिलेला आहे. त्यापैकी एक अहवाल मा. महापौर आणि एक अहवाल मा. उपमहापौरांना दिलेला आहे. म्हणजे सोळा सदस्य आणि आमचे एकूण चार अहवाल अशा मिळून वीस अहवालाची प्रिन्ट आउट काढलेली आहे. आम्ही त्याची झेरॉक्स मारून काढलेली आहे.

**मा. सभापती :-**

पण त्याच्यात कोणाची मिलीभगत असेल तर कोण काढणार झेरॉक्स, एखादा आपला?

**जेन्वी अल्मेडा :-**

मग कॉम्प्युटराईज प्रिन्ट होती का?

**नगरसचिव :-**

लेखा परिक्षण अहवालाची फक्त झेरॉक्स होती.

**रतन पाटील :-**

हा जो अहवाल बाहेर फुटलेला आहे. त्याबाबतची माहिती पेपरला आलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

ह्या अहवालाची संपूर्ण ठळक प्रिन्ट फुटलेली आहे.

**रतन पाटील :-**

आपण चर्चा करण्यापूर्वी ही बामती पेपरला आलेली होती. ही फार गंभीर बाब आहे.

**रमेश जैन :-**

हम लोग जो कामकी बाते करते है। यह बाते वह बाहर फैलाते है।

**रतन पाटील :-**

ही बातमी सदस्यांनी कुठून तरी समजते हे योग्य नाही.

**एस. ए. खान :-**

ही बातमी पेपरला कधी आली?

**रतन पाटील :-**

लेखा परिक्षण अहवाल फुटल्याची बातमी आजच्या पेपरला आलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

हम लागोकी उतनी मिटींग नही हुई थी और पुरा डिटेलमे पेपरमे आया है।

**दिपक खांबित :-**

हा जो ठराव आहे हा अनुपालन करुन स्थायी समितीपुढे सादर करावा असा ठराव आहे.

**रतन पाटील :-**

आपण हा विषय स्विकारला तर चालेल का?

**मा. आयुक्त :-**

आपण हा ठराव स्विकारायचा आहे.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

आपण हा ठराव स्विकारल्यानंतर त्याच्यावर चर्चा करणार आहोत. त्याच्यानंतर आपल्याला त्याचा पुर्तता अहवाल महासभेला सादर करायचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तीच सुचना मांडलेली आहे. आम्ही सर्व काही दिलेले आहे. तुम्ही पुढच्या वेळेला हा विषय चर्चेला घ्या.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आपण आता हा विषय आपल्या हातामध्ये घेउ आणि नंतर चर्चेसाठी दुरुस्त्या मागवू. आपल्याला या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. कारण या ठिकाणी असे बरेच प्वॉईन्टस दाखवलेले आहेत की, आपण आता त्याचा आभ्यास केला तर प्रश्न सुटू शकतो की नाही आपण याच्यावर चर्चा करु शकतो. जर आपण हा विषय असाच ठेवला आणि त्याच्यावर निर्णय दिला तर ते चुकीचे होईल. आपण तसा अहवाल हातात घेउ आणि जर तुम्हाला पाहिजे असेल तर तुम्ही त्यासाठी एक मिटींग लावा.

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्याबाबत आताच ठरवावे लागेल.

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १७७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**---------------- :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

आमच्याकडे हा ठराव आला. तुम्हाला त्याच्यासाठी वेळ पाहिजे असे तुम्ही स्पष्ट लिहा. तुम्ही पुढील सभेसाठी तयारीत या असे मी तुम्हाला पुढील सभेच्या दृष्टीने सांगतो. त्याच्यावर संबंधित विभागाने काय कार्यवाही केलेली आहे. त्याचीसुध्दा तयारी करा. नाहीतर मा. सभापती साहेब नंतर चर्चा करुया असे बोलतील. परंतु, तसे होणार नाही. आम्ही हा अहवाल स्विकारला आणि तुम्ही जो अहवाल पाठवलेला होता. आम्ही तो अहवालसुध्दा स्विकारलेला आहे. तरीसुध्दा जर तुम्हाला तसे काही हवे असेल तर आम्ही या बैठकीमध्ये तो अहवाल स्विकारलेला आहे. तुम्ही सविस्तर चर्चा करण्यासाठी पुढची बैठक जाहिर करा. पुढच्या बैठकीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी ज्या त्रुटी होत्या त्या डिपार्टमेन्टच्या त्या त्या अधिकाऱ्यांनी त्रुटी भरुन काढण्यासाठी काय प्रयत्न केलेला होता. त्याचे निवेदन व्यवस्थितपणे केले पाहिजे. व्यवस्थितपणे निवेदन करताना जर आपुलकी असेल तर त्याच्यावर तुमचेसुध्दा निवेदन झाले पाहिजे. जर अशाप्रकारची चर्चा झाली तर ती चर्चा महापालिकेच्या हिताची ठरेल.

**मा. आयुक्त :-**

आताच सन्मा. सदस्यांनी लेखा परिक्षण अहवालाबाबत जे वक्तव्य केलेल आहे मी त्या संदर्भात या समितीला सांगु इच्छितो की, केंद्र शासनाच्या महालेखा परिक्षकाकडून आपल्याकडे जो अहवाल प्राप्त झालेला आहे. तो अहवाल नियमाप्रमाणे किंवा कायद्याप्रमाणे किंवा कायद्यातील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीला सादर करणे आवश्यक आहे. हा अहवाल त्याप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे. स्थायी समितीने हा अहवाल स्विकारायचा आहे. हा अहवाल स्विकारल्यानंतर संबंधित विभागाने त्या अहवालाची पुर्तता करायची आहे. संबंधित विभागाने त्या अहवालाची पुर्तता केल्यानंतर त्याबाबतीतसुध्दा स्थायी समितीला अवलोकन करण्यात येईल की, प्रशासनाकडे अशा बाबतीत जे आक्षेप आलेले आहेत. त्याबाबत अशा अशाप्रकारे पुर्तता केलेली आहे. अहवालाची पुर्तता केल्यापैकी किती आक्षेप स्विकारले जातात किंवा स्विकारले जात नाहीत. त्याची माहिती स्थायी समितीला देण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपले लेखा परिक्षण दरवर्षी किंवा तीन वर्षानंतर झाले.

**एस. ए. खान :-**

आपल्याला हे आक्षेप अवलोकनार्थ पाठवावे. लागतील.

**रतन पाटील :-**

आपल्याला ह्या आक्षेपावर चर्चा करायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, अवलोकनावर चर्चा करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आपण अवलोकनासाठी हे आक्षेप पाठवले तरी आपल्याला त्या आक्षेपांवर चर्चा करावी लागेल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ज्या ज्या वेळी असे आक्षेप होते. त्यापैकी आम्हाला कळवणे गरजेचे होते.

**मा. आयुक्त :-**

याबाबतीमध्ये मी कुठचाही आड पडदा न ठेवता बोलतो. जेवढी पारदर्शकता ठेवण्याचा मला ठेवता येईल तेवढी पारदर्शकता ठेवण्याच मी प्रयत्न करतो. ह्यामध्ये माझे लपवून ठेवण्याचे काहीही कारण नाही. जो आक्षेप आलेला आहे. तो आक्षेप तुमच्या समोर ठेवायचा आहे. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब त्यामध्ये आक्षेप असे असतात की, नगरपालिकेच्या वेळेला ज्यावेळी अशाप्रकारचे आक्षेप येतात. ते आक्षेप आल्यानंतर त्याच्या कालावधीमध्ये एक महिन्याची पुर्तता करुन तो जनरल सभेला सादर करावा लागतो. जनरल सभेला सादर केल्यानंतर त्याची पुर्तता होत राहते. त्यांच्यासाठी मुख्य लेख परिक्षण करण्यासाठी बाहेरुन जे ऑडीटर येत होते. त्यांनी त्याच्यावर आक्षेप घेतलेले होते. यांनी हे केलेले नाही वगैरेसारखे ते आक्षेप होते. ज्यावेळेला असे आक्षेप घेतले त्यावेळेला त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही का केली नाही? त्या अधिकाऱ्यांना समज का दिली नाही? तात्कालीन नगरपालिका असु दे किंवा नगरपरिषद असु दे. तरी संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करायला पाहिजे. सन १९९६ पासुनचा लेखा परिक्षण अहवाल आहे. याचा अर्थ असा आहे की, आज आपल्याकडे दहा वर्षानंतर हा अहवाल आलेला आहे. यापुर्वी आक्षेप नगरपालिकेपासूनचे असु दे किंवा महापालिकेपासूनचे असू दे. परंतु, त्यावेळेला स्थायी समितीला कळविणे आवश्यक होते. तुम्ही त्यावेळेला कळविले नाही. आज ते आक्षेप पुन्हा केंद्र शासनाकडून आलेले आहेत. तुमच्या म्हणण्याप्रमणे हे आक्षेप स्थायी समितीपुढे सादर करायचे आहेत. त्याच्यानंतर ते आक्षेप पुन्हा मुख्य लेखा परिक्षकांकडे जातील. ते आक्षेप पुन्हा नंतर येतील. साहेब, बोलताना बोलले की, संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करु. तद्नंतर त्याच्यामध्ये ज्याकाही त्रुटी किंवा जे काही आक्षेप असतील ते पुन्हा स्थायी स्थायी समितीपुढे सादर केले जातील. नाहीतर ह्याच्यावर पुन्हा आक्षेप येतील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, बरोबर आहे. पण १९९६ पासून ते आहे.

**मा. आयुक्त :-**

आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

तेव्हा तात्कालीन स्थायी समिती होती. कारण त्यावेळी नगरपरिषद किंवा नगरपालिका असताना सादर करणे बरजेचे होते. आता आपले शेवटच पाचव वर्ष आहे. यावर्षी आपण हा विषय आणला. तात्कालीन आपण २००२ पासून सादर करायला पाहिजे होते. ज्या ज्या वर्षाचे आक्षेप होते ते.

**मा. आयुक्त :-**

दोन वर्षाच्या कालावधीमध्ये ज्या ज्या ठिकाणी ऑडीट झालेले आहे त्या त्या ठिकाणी आणि जेव्हा तेव्हा त्या ऑडीटची पुर्तता केली गेली. त्याचे जेवढे आक्षेप असतील. त्या आक्षेपाची तेवढी पुर्तता झाली असेल आणि त्याचपैकी किती स्विकारले जर १०० आक्षेप काढले असतील त्याच्यापैकी ५० जर स्विकारले. तर ५० तसेच पेन्डीग राहतात. तर त्याची पुन्हा पुर्तता करावी लागते.

**शशिकांत भोईर :-**

स्थायी समिती सभागृहाच्या सदस्यांचे असे मत आहे की जो अहवाल तुम्ही सादर करतात तो आम्ही घेतो आणि त्यावेळेला मा. सभापती साहेबांनी चर्चा करण्यासाठी मिटींग लावली. १९९६ पासून ते २००६ पर्यंत.

**रोहिदास पाटील :-**

कामकाजामध्ये २००५ सालाचे घेतलेले आहे की, आधीपासुन घेतलेले आहे अशी आमची माहिती आहे.

**बी साईड कॅसेट-१**

**पान नं १९ ते ३८**

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की इंडियन गर्व्हमेंट प्राधीकरण अन्वये आपण हा जो अहवाल केलेला आहे. हा अहवाल ह्या आर्थिक वर्षातील असून हा अहवाल सन २००५-०६ या वर्षातील आहे. स्थायी समितीने हा अहवाल मान्य करून घेतलेला आहे आणि याच्यावर मा. आयुक्तांबरोबर मी चर्चा केलेली आहे. प्रोसीजर अशी असते की हे परिक्षण आल्यानंतर या अहवालावर उत्तरे सबमिट करायची असतात. मा. आयुक्तांकडे याच्यावर चर्चा होते. ह्याच्यामध्ये जे काही मुद्दे आहेत. किंवा जे काही तीन प्रकारचे मुद्दे असतात. त्यात प्रमुख एन्ट्रीच्या बदली चूक झाल्यामुळे दंड आकारण्याचा मुद्दा, पैशाच्या आकारणीचा मुद्दा आणि प्रोसिजर चूक झाल्यामुळे असे वेगवेगळया प्रकारचे मुद्दे असतात. त्याची जी प्रोसिजर असेल ती मा. आयुक्तांच्या आदेशाने मुद्यावर पूर्तता केल्यानंतर आपण तो मुद्दा स्विकारू शकतो. मी जर अनुभव अहवालाच्या परिक्षणाची पुर्तता आहे. तर उरलेला जो परिच्छेद आहे. तो स्थायी समितीसमोर येईल. अनुपालन झालेल्या मुद्‌दयांचे स्पष्टीकरण दिले जाईल. अशी विहीत पद्धती आहे. आपला आताचा जो सेन्ट्रल गर्व्हमेंटचा आहे. मी तुम्हाला त्याबाबत माहितीसाठी सांगतो की मागच्या वर्षी अग्निशमन अधिकाऱ्यांनी जो ५७ परिच्छेदाचा रिपोर्ट सादर केलेला होता. त्या रिपोर्टवर जी काही उत्तरे दिली सादर केलेला होता. त्या रिपोर्टवर जी काही उत्तरे एजन्टमार्फत दिली आणि ५७ पैकी ५० मुद्दे राहिलेले आहेत. ५० मुद्दांबाबत साहेबांकडून माहिती घेतलेली आहे. मी ही माहिती ए.जी.ला पाठवलेली आहे. ए.जी. चा मुद्दा असा आहे की त्याच्यावर निर्णय निकाली आहे. मी आताच संपूर्णपणे अहवाल तयार करुन ठेवलेला आहे. मी जे काही मुद्दे मांडलेले आहेत. त्याबाबतचा तो अहवाल आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५, २००५-०६ हे अहवाल सादर केलेले नाहीत.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखा परिक्षक) :-**

आम्ही हे अहवाल सादर केलेले नाहीत श्री. नाकाडीसाहेबांनी हे अहवाल सादर केलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

स्थायी समितीला सादर केलेले असतील ना.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखा परिक्षक ) :-**

हे मुद्दे स्थायी समितीला सादर केलेले होते.

**शशिकांत भोईर :-**

हे अहवाल स्थायी समितीला सुद्धा सादर केलेले नाहीत. तुमचा सन १९९६ पासूनचा अहवाल घेतलेला आहे. तुम्ही हा अहवाल ज्या ज्यावेळेला सादर केलेला होता. नाकाडी साहेबांनी त्यावेळेला त्यांनी सन १९९६ चे आक्षेप आणलेले नाहीत. एकतर त्यांच्याकडून चुक झालेली असेल किंवा त्यांची चुकी असेल तर ती सुधारण्याचा तुम्ही प्रयत्न केला असेल.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

खरे म्हणजे लेखा परिक्षणामध्ये ज्या काही त्रुटी निर्देशनास आल्या त्या मागच्या वर्षीच्या पुढे कॅरी फॉरवर्ड होत असतात. आता त्या सन १९९६ मध्ये झालेल्या आहेत. जरी मला त्या चुका सन २००५ मध्ये दिसल्या तरी त्या मांडणे हे माझे कर्तव्य होते. म्हणून मी माझे कर्तव्य पार पाडलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याकरिता आमची सभागृहाला अशी विनंती आहे की मा. सभापतीसाहेबांनी ह्याच्यावर विचार करण्यासाठी मिटींग लावावी आपण ह्याच्यावर खास करुन चर्चा करुया.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखा परिक्षक) :-**

चालेल.

**रतन पाटील :-**

आम्हाला चर्चा करण्यासाठी वेळ दया.

**रोहिदास पाटील :-**

आता हा तांत्रिक मुद्दा आहे. हे जे आले तुम्ही हे सोळा सदस्यांकडे दिले. मा. महापौरांना दिले, मा. आयुक्तांना दिले. सचिवांना दिले. त्याच्या २० कॉप्या काढल्या आणि २० कॉप्या दिल्या. हे पेपरला आले. ह्याच्यामध्ये काय चूक आहे? हा अहवाल लेखा परिक्षकांनी सादर केला. आपण गृहित धरले की तुम्ही आम्हाला रिपोर्ट पाठवला. आम्हाला तो रिपोर्ट माहितीसाठी पाठवला.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

या ठिकाणी अशी अपेक्षा असते की प्रशासनाचा जो एखादा अहवाल आहे. तो प्रशासनाचा अहवाल सक्षम प्राधीकरणाकडे प्राधान्याने जायला पाहिजे. तो त्यांचा रिस्पेक्ट असतो. जर समजा तो संबंधित प्राधिकरणाकडे गेला नाही आणि जर तो अहवाल वर्तमानपत्राच्या माध्यमातून पब्लिश होत असेल तर ह्याच्यामध्ये कुठेतरी काहीतरी कमतरता आहे असे वाटत नाही का?

**रतन पाटील :-**

आपण ह्याच्यावर नंतर चर्चा करुया. आपण विषय आणायला पाहिजे होता.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

आपण चर्चा केल्यानंतर मग तो विषय बाहेर डिक्लेअर होता कामा नये. म्हणजे ह्या सभागृहामध्ये जे प्रश्न विचारले जातात किंवा आम्ही सभागृहात चर्चा होण्यापूर्वी बाहेर बातमी कशी गेली?

**रोहिदास पाटील :-**

यासाठी मी तुम्हाला म्हणतो की तुम्ही आम्हांला हे दिले, हे आता दिले. आपल्यापैकी एकाने सांगितले ह्याच्यामध्ये काही त्रुटी आहेत. जर असे काही बोलले तर ते चूक आहे की बरोबर आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

आपल्याकडे अहवाल सादर केल्यानंतर त्याच्यावर आपल्याला मत प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्यापैकी कोणीतरी असेल किंवा सोळा सदस्यांपैकी कोणीतरी हा घेतलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण वीस सदस्यांना दिलेला आहे. तुम्ही फक्त सोळा सदस्य पकडू नका.

**रोहिदास पाटील :-**

जर वीस सदस्य असतील तर बावीस सदस्यांपर्यंत जेवढे ते अधिकृत आहे साईन करतो.

**नगरसचिव :-**

आपण सोळा सदस्यांमध्ये आणखी चार सदस्य असे मिळून वीस सदस्य झाले. त्याच्यामध्ये मा. महापौर, मा. आयुक्त आणि मा. उप-आयुक्त यांचे एक-एक सदस्य येतात.

**एस. ए. खान :-**

जर चर्चेपूर्वी बातमी पसरत असेल तर त्याला काहीही अर्थ नाही.

**रतन पाटील :-**

आमच्याकडे अशा पद्धतीने आक्षेप आलेले आहेत. आणि आम्ही त्या विषयावर चर्चा केलेली आहे

**मा. सभापती सो. :-**

चर्चा होण्यापूर्वी ही बातमी सर्वत्र पसरते ही गंभीर बाब आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता मा. आयुक्त साहेब, मा. सभापतीसाहेबांची खात्री पटली असेल की ह्या सभागृहामध्ये कोणीही १६ सदस्य दिलेले नाहीत. कोणाच्याही मनात दुसरे काहीही नाही.

**मा. सभापती सो. :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १७८ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदरचा विषय पुढच्या वेळेला घेण्यात यावा.

**परशुराम म्हात्रे :-**

(ठरावाचे वाचन केले.)

__________

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**परशुराम म्हात्रे :-**

या ठरावामध्ये अग्निशमन कर वगळून असे म्हटलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते नागरिकांचे काम आहे. आपण नागरिकांना कर लावत आहोत.

**रतन पाटील :-**

आपण व्यावसायिकांवर कर लावत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

आपण अग्निशमन ऐवजी जे ओपनिंग केले. मला त्याबाबत असे म्हणायचे आहे की आपण स्थायी समितीला त्याबाबत ठराव करुन दिलेला आहे. भाईंदर पूर्वला असलेल्या अनेक औदयोगिक वसाहती, दाटीची वस्ती इत्यादी ठिकाणी अग्निशमन दलाचे केंन्द्र जवळ असावे म्हणून स्थायी समितीने ठराव करुन दिलेला होता. परंतु, महासभेने करुन दिलेल्या ठरावाचेसुद्धा पुर्तता होत नाही. ती पुर्तता का होत नाही? भाईंदर पूर्वला आग लागण्याचे प्रमाण जास्त आहे. मग ती आग घरामध्ये लागू दे किंवा कारखान्यामध्ये लागू दे. आपण मंजूरी दिलेली आहे. महासभा आणि स्थायी समितीनेसुद्धा मंजूरी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

मागच्या स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

ह्या बजेटवरून मंजूरी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग तुम्ही प्रशासन आणि अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना विचारा.

**दिपक खांबित :-**

आपण ह्या बजेटमध्ये तरतुद करुन घेतलेली आहे. आपण पूर्वी पाणी खात्याची मंजूरी घेतलेली होती.

**रतन पाटील :-**

ज्यावेळेला श्री. तुळशीदास म्हात्रे होते. त्यावेळेला मंजूरी दिलेली होती.

**दिपक खांबित :-**

आपल्याला पाठीमागची जागा पुरत नाही म्हणून नवघर शाळेमध्ये जी जागा आहे. आपण तिथे कॉर्नरला सुरूवातीला मंजूरी घेतलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही प्रथम टाकीजवळ केलेले होते.

**दिपक खांबित :-**

टाकीजवळ अग्निशमन दलाचे केंन्द्र करु शकत नाही कारण ते आतमध्ये पडते. आपण तिकडे किंवा जी शाळेची जागा आहे तिथे कुठेतरी नकाशा बघून मंजूर करुन घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

श्री. तुळशीदास म्हात्रे तुम्ही सभापती होते. मग तुम्ही का बोलत नाही? आम्हांलाच बोलायला लागते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मागच्यावेळेला असे ठरलेले होते की कुठेतरी टाकीच्या खाली आपल्याला जागा उपलब्ध असल्यामुळे आपण त्या ठिकाणी अग्निशमन दलाचे केन्द्र चालू केलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, गोडदेव टाकीखाली नसून नवघर टाकीखाली आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांचा जो ठराव आहे. मला त्या ठरावाची माहिती द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ठराव झालेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब गोडदेवला जागा नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपण सगळी बजेट प्रोव्हिजन केलेली आहे. याला महासभा किंवा स्थायी समितीने विरोध करायची नाही. आपण ते ठरवून केलेले आहे. परंतु, यांनी दिरंगाई केलेली आहे असे उत्तर देऊन विषय संपवावा.

**रतन पाटील :-**

साहेब, नवघर टाकीबाबत काय म्हणणे आहे?

**दिपक खांबित :-**

आपण गेल्यावेळेला सिल्व्हर पार्कबाबत विषय आणलेला होता.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबित साहेब, आम्ही तुम्हाला अशी विनंती करतो की तुम्ही आम्हाला चुकीचे उत्तर देऊ नका योग्य उत्तर द्या.

**रमेश जैन :-**

ईस्ट, वेस्ट, सिल्व्हर पार्कला किजिये।

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुम्हाला चुकीची माहिती देणार नाही. काय चाललेले आहे? हे आम्हांला माहिती आहे. तुम्ही काहीतरी माहिती देऊ नका.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड साो.) :-**

याच्यावर अग्निशमन दलाच्या अधिका-यांचे काय म्हणणे आहे?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही माहिती द्यायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

जर झुणका भाकर केन्द्रामार्फत टप-यांना जागा मिळू शकते तर महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या केन्द्राला जागा का मिळू शकत नाही? आपण त्या ठिकाणी लोकहितासाठी जागा करित आहोत. झुणका भाकर केन्द्राच्या बाजूला टप-या उभ्या राहू शकतात. तिथे अग्निशमन दलाचे केन्द्र उभे राहिले तर कोणाला त्रास आहे? सगळ्या बाजूने मोकळा रस्ता आहे. तुम्ही निर्णय का घेत नाही? तिथे जास्त जागा जाणार नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण ज्या ठिकाणी अग्निशमन दलांची जागा प्रस्तावित केलेली होती. त्या जागेबाबत अग्निशमन दलाच्या अधिका-यांचे काय म्हणणे आहे? ते बघा.

**रतन पाटील :-**

अग्निशमन दलाचे स्थानक आणि जागा कशी असावी? ते सुद्धा सांगावे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही नवघररोडबाबत म्हणता. परंतु, नवघरचे नागरिक कुठल्याही गोष्टीला आक्षेप घेतात. मागच्या वेळेला मी नवघरच्या गार्डन समोरील गाळे काढायला सांगितलेले होते. नगरपालिकेला पैसे खर्च करण्याचे नगरपालिकेला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळाले असते परंतु उत्पन्नाच्या विचार कोणीही करित नाही. मला गेल्यावर्षी विरोध केलेला होता.

**रतन पाटील :-**

परंतु, ते तुमचेच सहकारी होते. त्यांनीच विरोध केलेला होता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आमचे सहकारी होते. असे तुम्ही बोलू नका.

**रतन पाटील :-**

आम्ही विरोध केलेला नाही. आम्ही आमचे म्हणणे मांडलेले आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढवा असे आम्ही बोलतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही दुस-यांचे सहकार्य घ्या. तुम्ही झुणका भाकर केन्द्र तोडून टाका.

**रतन पाटील :-**

तुम्ही झुणका भाकर केन्द्र तोडू नका. ह्यांना पर्यायी जागा मिळू शकते. आम्ही महापालिकेच्या संदर्भात बोलतो. आम्ही कोणाच्या वैयक्तिक गोष्टींबाबत बोलत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण स्थायी समितीला असताना तुम्ही-आम्ही सगळे एक आहोत.

**रतन पाटील :-**

आपण एकच आहोत. मी उत्पन्नाच्या संदर्भात कधीही विरोध केलेला नाही.

**क्लासो फर्नांडिस :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, अगोदर ठरले होते की, आपण नवघर टाकीच्या खाली फायरस्टेशन बांधायचे आहे. परंतु, त्या ठिकाणी जायला-यायला त्रास होतो. कारण संध्याकाळच्या वेळेला त्या ठिकाणी फेरिवाले बसतात. तिथून गाडी जायला यायला वेळ लागतो. परंतु, आम्ही अग्निशमन दलाच्या नियमाप्रमाणे ........

**शशिकांत भोईर :-**

श्री. क्लासो साहेब, तुम्ही शाळेच्यासमोर अग्निशमन दलाचे केन्द्र बसवणार आहात की टाकीच्यासमोर बसवणार आहात ते प्रथम स्पष्ट करा.

**क्लासो फर्नांडिस :-**

अग्निशमन दलाचे केन्द्र टाकीच्या खाली करण्याचे सुचवण्यात आलेले होते. परंतु, आमची अशी अडचण आहे की आमच्या नियमाप्रमाणे अडीच मिनिटाच्या आतमध्ये गाडी कॉलवर जायला पाहिजे. त्या अनुषंगाने आमचे फायर स्टेशन व्हायला पाहिजे. त्याच्यासाठी आमची अशी सुचना आहे की तुम्ही आम्हाला मेन रोडवर कुठेतरी जागा द्या. जेणेकरून आम्ही अडीच मिनिटांचा कालावधी पूर्ण करु शकतो. आणि आम्ही ठरवलेल्या वेळेमध्ये फाटकापर्यंत सुद्धा कव्हर करु शकतो. जर तुम्ही आम्हाला ती जागा दिली तर आम्हाला

बाहेर यायला एवढा वेळ लागेल की आम्ही तेवढया मुदतीपर्यंत तिथे पोहोचू शकणार नाही असा जो स्थानिक रोड आहे. त्याठिकाणी दोन वळणे घ्यावी लागतात. म्हणून जे महालेखापाल आहेत. त्यांनी तो जागा आतमध्ये असल्यामुळे स्थानिकांवरसुद्धा ऑब्जेक्शन घेतलेले आहे. त्याच्यामुळे आम्हाला मुख्य रस्त्यावर अग्निशमन स्थानक द्या. जेणेकरून आमचा वेळ वाया जाणार नाही. आम्ही लगेच घटनास्थळी पोहोचू शकतो. नवघर शाळेचे जे मैदान आहे. त्या मैदानाच्या मुख्य रस्त्यावर अग्निशमन दलाचे केन्द्र मिळाले तर आम्हाला बंदरवाडी कव्हर करता येईल. जेसल पार्कचा संपूर्ण एरिया एका बाजूने भाईंदर फाटकचा संपूर्ण एरिया कव्हर होईल. जर टाकीखाली अग्निशमन दलाच्या स्टेशनसाठी जागा दिली तर आम्हाला बाहेर यायला वेळ लागेल. आपण तिथे रिक्षा स्टॅन्ड दिला तर आम्हाला तिथे फार वेळ जाईल. आम्हाला वेळेत पोहोचणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला एकूण किती जागा लागते?

**क्लासो फर्नांडिस :-**

आम्हांला २५ X २५ मीटरची जागा लागेल.

**दिपक खांबित :-**

म्हणजे तुम्हाला १०० X १०० फूटची जागा लागेल. नवघर टाकीकडे सी.आर.झेड लागतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जर सी.आर.झेड आग लागली तर अग्निशमन दलाची लोक ती आग बुजवणार आहेत. तुम्ही काहीही सांगत नगरपालिका आपली आहे आणि आपण नगरपालिकेचे आहोत.

**दिपक खांबित :-**

भाईंदर (पूर्व) च्या अग्निशमन केन्द्राबाबत बजेट तरतुद पुढच्या महिन्यात झाली की आपण हा विषय मंजूरीला घेऊन निविदा मागवूया.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला जी जागा निश्चित करायची आहे. तो जागा निश्चित करताना अग्निशमनचे जे अधिकारी असतील. त्यांच्याशी सल्लामसलत करुन जागा निश्चित करायची आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझी मा. सभापतींना विनंती आहे की तुम्ही जागा निश्चित करा आणि नंतर टेन्डर कॉल करा. जागा निश्चित झाल्यानंतर टेन्डर कसे काढता? तुम्ही आज जागा निश्चित करा आणि नंतर टेन्डर काढा.

**रोहिदास पाटील :-**

ते त्यांची पुर्तता करतील.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी नवघर जागेबाबत सुचवलेले होते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

गोल्डन नेस्टला भरपूर जागा आहे.

**शशिकांत भोईर :-**

अग्निशमन दलाच्या लोकांना स्थानकापर्यंत पोहोचायला अडीच मिनिटाची वेळ आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**रतन पाटील :-**

अग्निशमन दलाचा जो कर आहे. हा कुठल्याही नागरिकांवर लादला जाता कामा नये. ही माझी सुचना आहे. जो कर आहे तो तसाच राहिला पाहिजे. आणि तो कर नाकारला जाता कामा नये अशी माझी सुचना आहे.

**प्रकरण क्र. १७८ :-**

अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणे.

**ठराव क्र.  :-**

मिरा-भाईंदर क्षेत्रात उंच इमारती बांधण्याचे काम वेगात सुरू आहे. अग्निशमन दलाकडे असलेला अपुरा कर्मचारी वर्ग व अपुरी साधनसामुग्री लक्षात घेऊन अग्निशमन दलासाठी अधिकचे मनुष्यबळ व अत्याधुनिक साधनसामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे. सदर बाबत अग्निशमन दलाकडून खालीलप्रमाणे महसुल गोळा करण्यात येतो.

१) अग्निशमन कर
२) कॅपीटेशन फी
३) इन्सपेक्शन फी / दाखला फी

सध्या अग्निशमन कर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १% प्रमाणे घेण्यात येत आहे. तसेच विविध उंचीच्या इमारतींवर वेगवेगळ्या दराने कॅपीटेशन फी आकारण्यात येते. तसेच दाखला फी सुद्धा वेगवेगळया दराने आकारण्यात येते.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये उंच इमारतीमधील आग विझविणे किंवा लोकांची सुटका करणेसाठी अत्याधुनिक असे हायड्रोलिक प्लॅटफॉर्म किंवा टर्न टेबल लॅडर (टी.टी.एल.) हे खरेदी करणे आवश्यक आहे. सदर वाहनांची बाजार भावात अंदाजे किंमत रु. ४.५० कोटी एवढी आहे. तसेच अग्निशमन स्थानके उभारणे व त्याकरिता लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागणार आहे.

सध्या अग्निशमन दलाकडे पुढीलप्रमाणे महसूल जमा होत आहे.

१) अग्निशमन कर १% प्रमाणे अंदाजे ८० लाख

२) कॅपीटेशन फी अंदाजे ५० लाख

३) इन्सपेक्शन फी / दाखला फी अंदाजे ५० हजार

अशा प्रकारे अग्निशमन दलाकडून रु. १.३० कोटी एवढे उत्पन्न महानगरपालिकेस मिळते. जर सोबत जोडलेल्या प्रस्तावाप्रमाणे अग्निशमन कर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मूल्यावर २% तसेच कॅपीटेशन फी व दाखला फी यामध्ये दाखविलेल्या दर वाढीस मंजूरी मिळाल्यास अग्निशमन दलाकडील उत्पन्नात दुप्पटीने भर पडून भविष्यात अग्निशमन दलास लागणारे मनुष्यबळ व अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करणे सोयीचे होईल.

सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे अग्निशमन कर वगळून उर्वरित प्रस्तावित दर मान्य करण्यात येत असून मा. महासभेच्या मंजूरीस शिफारस आहे असा ठराव मांडत आहे

**सुचक :- श्री. रविंद्र माळी** **अनुमोदन :- श्री. गीता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १७९ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १७९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. :-**

**सुचक :- श्री. रविंद्र माळी** **अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८० चे वाचन केले.)

**दिपक खांबित :-**

प्रशासनाला जो अहवाल दिलेला आहे. त्याबाबत सर्व सन्मा. सदस्यांनी त्याला मंजूरी द्यायची आहे.

**रतन पाटील :-**

मग तुम्ही तो प्रशासनाचा अहवाल चर्चेला घेऊ नका.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १८० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन अहवाल सन २००५ - ०६ सादर करणे.

**ठराव क्र. १८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००५-०६ वर्षाचा प्रशासन अहवाल मा. स्थायी समितीपुढे वाचन केले. त्याची तपासणी व अवलोकन करणेत आले. त्यास मंजुरी देणेत येत असून त्या अहवालाच्या छापील प्रती महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांना पाठविणेत यावे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी** **अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा यांनी सभागृहासमोर प्रकरणे क्र. १८१ च्या ठरावाचे वाचन केले.)

**गिता जैन :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १८१ :-**

निविदेस मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १८३अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पश्चिम) येथे आरक्षण क्रमांक ५७ स्टेडीयम करीता राखीव आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत मातीभराव करुन मैदान तयार करण्यात आलेले आहे. सदर मैदानावर मोठ्या प्रमाणावर खेळाचे कार्यक्रम, स्पर्धा होत असतात. मागील दोन वर्ष सदर मैदानावर MCA (Mumbai Cricket Association) मार्फत मिरा भाईंदर क्षेत्रातील खेळाडूकरीता प्रशिक्षण आयोजित करण्यात येत होते. परंतु, सदर मैदानावरील Pitch ची परिस्थिती व्यवस्थित नाही. तसेच बसण्याकरिता शेड, पेव्हेलियन, शौचालय, बाथरुम इ. व्यवस्था नसल्याने MCA ने प्रशिक्षण केंद्र बंद केलेले आहे. याबाबत सदर MCA च्या पदाधिका-यांशी मा. महापौर दालनात दि. २१/१२/२००६ रोजी चर्चा झाली. त्यानुसार त्यांना वरील नमुद सोयी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. तसेच MCA चे दोन माळी ठेवावयाचे आहे. सदर कामी रु. १५.०० लक्ष एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर काम हे अंदाजपत्रक दराने सुशिक्षित बेरोजगार यांना सेवा सवलती अंतर्गत काम वाटप करीता पाठविण्यात आले होते. त्यांनी सदर काम अंदाजपत्रक दराने मे. गृहशिल्पी कन्स्ट्रक्शन यांच्याकडून करुन घेण्यास मान्यत दिलेली आहे. तरी सदर रु. १५.०० लक्ष रकमेच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार व ठेकेदाराची वेळावेळी येणारी देयके प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी अल्मेडा** **अनुमोदन :- श्रीम. गीता जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८२ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आम्ही त्या चौपाटीवरील झाडांना पाणी मारतो. परंतु, तुम्ही पाणी मारायला देत नाही. तुम्ही आम्हाला वॉचमेन देत नाही, माळीसुद्धा देत नाही. मग तेथील झाडे कशी जगणार? शिवाय तुम्ही आमच्या पत्राला उत्तरसुद्धा देत नाही. चौपाटीवर माळीसुद्धा नाही आणि वॉचमेनसुद्धा नाही. चौपाटीवर मुले नाहीत, वॉचमनसुद्धा नाहीत.

**मा. सभापती सो. :-**

आपण जी नारळाची झाडे लावतो. त्याची देखभाल करण्यासाठी दोन मुले द्या.

**शशिकांत भोईर :-**

साहेब आता जे प्रकरण क्र. १८२ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१)(२) नुसार अधिकार प्रदान करण्यासाठी मान्यता देणे याबाबत आपण यापूर्वी आपल्या अधिकारात मान्यता दिलेली आहे. ती वैध आहे की अवैध आहे. मला असे वाटते की आपल्या स्थायी समितीला आपल्या अधिकारांच्या अनुषंगाने विषय आलेला आहे. आपले जे विधी अधिकारी आहेत. त्यांना याबाबत विचार.

**मा. आयुक्त :-**

कायद्यामध्ये अधिकार देण्याची जी तरतुद आहे. ते अधिकार प्रदान करायचे असतील तर ते स्थायी समितीच्या मान्यतेने प्रदान करावे लागतील.

**शशिकांत भोईर :-**

आपण यापूर्वी उप-आयुक्त आणि काही अधिका-यांना अधिकार दिलेले आहेत. याच्यासाठी त्याच्यामध्ये स्थायी समितीने मंजूरी घेतली नसेल तर ते वैध आहे की अवैध आहे.

**एस. ए. खान :-**

आपण मंजूरी कुठे घेतली?

**शशिकांत भोईर :-**

आपण यापूर्वी मंजूरी घेतलेली होती का? आपण उप-आयुक्त आणि अन्य अधिका-यांना जे अधिकार दिले. आपण त्यावेळेला स्थायी समितीच्या कलम ६९(१) व (२) नुसार मंजूरी घेतलेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण अधिकार कुठे दिले?

**रोहिदास पाटील :-**

दि.२६/०६/२००६ पासून त्यांची नेमणुक केली. परंतु, त्यांना कोणतेही अधिकार दिलेले नाहीत किंवा त्यांनी कोणतेही काम केलेले नाही का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्यांना अधिकार दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मग त्यांनी कोणतेही काम न करता त्यांना अधिकार कसे दिले?

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये कायद्यातील ज्या तरतुदी आहेत. त्या तरतुदींप्रमाणे स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आम्ही तुमच्याशी सहमत आहोत.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये महापालिकेच्या स्थापनेपासून कृती होणे आवश्यक होते.

**शशिकांत भोईर :-**

मी तुम्हाला तेच सांगतो. यापूर्वी अशा अधिका-यांना अधिकार दिलेले होते का?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेच्या स्थापनेपासून अशाप्रकारचे अधिकार देणे आवश्यक होते.

**शशिकांत भोईर :-**

असे होणे आवश्यक होते. म्हणून जे चार मिटींगपासून हा पायंडा पडलेला दिसतो. परंतु, मला तेव्हा या बाबी लक्षात आल्या नसतील किंवा आज आपल्या लक्षात आलेल्या आहेत. आम्हाला तुमचे जे अधिकार आहेत. ते माहिती करुन द्यायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याबद्दल धन्यवाद देतो.

**रोहिदास पाटील :-**

आपण त्यांना नेमणूक देतेवेळी कोणते अधिकार दिले. फक्त नेमणूक दिली की अधिकार दिले. आता सात महिने झालेले आहेत. ते सात महिने काम करित आहेत. आपण त्यांना कुठलेही अधिकार दिले नाहीत का?

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्तांना अधिकार दिले असतील ना.

**मा. आयुक्त :-**

आम्हाला अधिकार दिलेले आहेत.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

यासाठी आम्ही तुम्हाला विचारतो की जर तुम्ही त्यावेळेला टिपणी दिली असती तर ह्याचे जे सिलेक्शन होते. त्या सिलेक्शनसहित या वर्गाच्या अधिका-याला या स्थायी समितीने मंजूरी दयावी.

**मा. आयुक्त :-**

आमच्या लक्षात आले म्हणून आम्ही आता स्थायी समितीच्यासमोर सादर केलेले आहे. मी काय म्हटले की नगरपालिकेच्या स्थापनेपासून अशाप्रकारची प्रोसीजर चालू आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आता आपले जे उप-आयुक्त आहेत. त्यांना जे अधिकार दिलेले आहेत. तुम्ही ते अधिकार मंजूर करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

सात महिने झाल्यामुळे कामकाज बेकायदेशीर होते असे आम्ही समजायचे का?

**मा. आयुक्त :-**

मला ताबडतोब मंजूरी द्यायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता आपले जे उप-आयुक्त आहेत. त्यांना जे अधिकार दिलेले आहेत. तुम्ही ते अधिकारसुद्धा मंजूर करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीचे जे अधिकार आहेत. स्थायी समितीने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आपण उशिरा का होईना परंतु, त्या नियमाने जाऊ जे ६९(१) व (२) कलम आहे. त्याप्रमाणे आपण जाऊ. हा पायंडा पाडल्याबद्दल तुमचे हार्दिक धन्यवाद देतो. कारण आमचे जे आयुक्त आले त्यांनी केले नसेल परंतु, आमच्या सभापतींनी सभागृहातील त्याचा पायंडा पाडलेला आहे. जर हा पायंडा नियमाला धरुन पाडला तर आम्हाला बरे वाटेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण अधिकार प्रदान करतो. परंतु, अधिकारांचा वापर करताना जर त्याच्यामध्ये कुचराई किंवा काही केले तर त्याच्यावर काय ॲक्शन घेणार?

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, ह्याच्यावर ॲक्शन वगैरे काहीही घेण्याची गरज नाही. आपण नेमण्यासाठी ठराव करतो तर आपण काढण्यासाठी सुद्धा ठराव करुन द्या.

**ध्रुवकिशार पाटील :-**

काशीगांवला जो महापालिकेचा रस्ता आहे. त्याबाबत जागा मालकाने वादविवाद केला. तो कोर्टात गेला. त्यावेळेला आपल्या पालिकेचा अधिकारी मी आणि माझ्या स्वतःच्या मित्राने फोन करुन सुद्धा तो वकिल या केसला हजर राहिजेला नाही. त्यांनी ती केस अटेन्ड केलेली नाही आणि तो वकिल फीसुद्धा घेतो.

**रोहिदास पाटील :-**

आमचे एवढेच म्हणणे आहे की ह्यांची नेमणूक झालेली होती. त्यावेळेलासुद्धा अशी चर्चा झालेली होती की, ज्यांनी चांगली कामे केली असतील त्यांचे निवेदन करा. आम्ही त्यांचे धन्यवाद करतो. परंतु, ते निवेदन करित नाहीत.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की आपण विधी सल्लागारांना अधिकार प्रदान करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, मी तुम्हाला सांगतो की तुम्ही जेव्हा ह्या केसेस हरलेल्या होतात. त्याबाबत मला असे सांगायचे आहे की बिल्डर लोक स्टे घेतात. आपला वकिल तिथे हजर असेल तर तिथे दोन शब्द बोलू शकतो. आपला वकिल कमीत कमी एवढेतरी करु शकतो. स्टे घेतो तर जसे आहे तसे करा. एक भिंत बांधायची तर एकच भिंत राहिली पाहिजे. चार बाजूला भिंती कशा होतात? मग आपल्याला स्टेचा काय फायदा आहे? आपल्या वकिलांनी आम्हाला वाचायला दिलेले नाही. आपल्याकडे किती वकिल आहेत. तुम्ही ते हजर करा. मी त्यांना प्रश्न विचारतो.

**मा. आयुक्त :-**

विधी अधिकाऱ्यांनी आतापर्यंत काय केलेले आहे? त्याची माहिती सन्मा. सदस्यांना हवी असेल तर आम्ही देतो.

**रतन पाटील :-**

तुम्हाला ती माहिती द्यावी लागेल.

**एस. ए. खान :-**

तुम्ही आम्हाला माहिती द्या.

**मा. आयुक्त :-**

हे ज्या दिवशी पाठवलेले होते. तर त्याच्यावर लगेच अंमलबजावणी करतो.

**रतन पाटील :-**

आपल्याला आतापर्यंत अधिकार दिलेले आहेत. आणि आपणच वकिल नेमलेले आहेत.

**विधी अधिकारी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते की आपण आता विषय घेतला मी त्या संदर्भात ॲडव्होकेट श्री. साही त्यांच्याशी विचारणा केलेली होती. त्यांना विचारले की तुम्ही सदर केसला हजर होतात का? त्यांनी मला उत्तर दिले की मी ह्याबाबत कोर्टाला इन्फार्म करुन गेलेलो होतो की मी येत आहे आणि मी नंतर दुसऱ्या मॅटरमध्ये बिझी झालो. त्याच्यामध्ये आपले डब्यू.एस. दाखल झालेला आहे. संपूर्ण माहिती ९० दिवसांच्या आतमध्ये गेलेली आहे. आपण आपली संपूर्ण बाजू त्याच्यामध्ये मांडलेली आहे. आता आपले एग्झिब्युटर सुनावणीसाठी त्याच्यामध्ये जी मिनव्हाईल ॲक्शन आहेत. त्यांनी अर्ज केल्यामुळे त्यांना करायचे आहे. म्हणून ते अर्ज प्रलंबित असल्यामुळे त्याची सध्या सुनावणी होईल आणि त्याच्यानंतर एग्झिब्युअर-५ ची सुनावणी होईल.

**रतन पाटील :-**

साहेब ही पळवाट झाली.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही कोर्टामध्ये हजर राहून नंतर आम्हांला माहिती द्या. तुम्ही ज्या दिवसापासून इथे हजर झालात किंवा तुम्हाला चार्ज दिला त्यावेळेला तुम्हाला या स्थायी समितीने मान्यता दिलेली होती. त्या दिवसापासून आम्ही एवढया केसेस जिंकल्या किंवा जे स्टे होते ते रिव्होट केले किंवा व्हॅकेट केले असा तुम्हाला अनुभव असेल तर सांगा. खरे असेल तर तसे सांगा की मी या केसेसच्या प्रयत्नात आहे. पुढे महिना दोन महिन्यावर याचा निकाल लागेल असे सांगितले तर सगळ्यांना बरे वाटेल. तुम्हांला टिपणी दिलेली आहे आणि तुम्ही चांगले काम करा असे आम्ही सांगितलेले होते. तुम्ही त्याची पुर्तता करायला पाहिजे.

**विधी अधिकारी :-**

साहेब, ह्याच्यामध्ये असे झालेले होते की पूर्वी अतिक्रमण विभाग, विधी विभाग आणि नगररचना विभाग एकत्र असल्यामुळे संचिका प्रत्येक विभागामध्ये होत्या. मा. आयुक्तांच्या आदेशाने संबंधित सर्व विभाग म्हणजे विधी विभागाच्या सर्व संचिका आधी वर्ग करुन घेतल्या. आणि आम्ही वर्षाप्रमाणे फाईली लावलेल्या आहेत. जेणेकरुन आम्हाला फाईली कशाप्रकारे आहेत ते समजेल. आमच्याकडे त्या फाईली आहेत की नाहीत ते समजेल. आम्ही त्याच्यामध्ये आमच्या फाईली वर्षाप्रमाणे लावून झालेल्या आहेत. आम्ही आता सन २००६ संपवून सन २००५ मध्ये आपल्या बाजूने किती निकाल लागलेले आहेत? आणि आपल्या अगेन्स्ट किती निकाल गेलेले आहेत ह्याची यादी तयार करतो. आम्ही ह्याच्यामध्ये सध्या मला जेवढे सांगता येईल तेवढे सांगतो की आपल्या फेव्हरमध्ये किती मॅटर लागलेले आहेत? ह्याच्यामध्ये मा. उच्च न्यायालयात पी.आय. दाखल झालेला होता. तो ७८/२००६ चा होता. तो निर्णय आपल्या बाजूने लागलेला आहे. आपल्या अगेन्स्ट अनधिकृत बांधकामासंदर्भात जनहित याचिका दाखल झालेली होती. तो निर्णय आपल्या बाजूने लागून खालच्या कोर्टाला आदेश दिलेले आहेत की तुम्ही त्यांचे जे दावे पेन्डिंग आहेत. त्याचा दोन महिनयाच्या आतमध्ये निर्णय देऊन तुम्ही त्या महापालिकेला त्याप्रमाणे आरक्षण द्यावे. दुसरी गोष्ट अशी आहे की बी. पी रोडला जागृती अपार्टमेंट नावाची इमारत आहे. आपण त्या संदर्भात खालच्या कोर्टात दावा जिंकलेला आहे. परंतु, त्यांनी त्याच्यामध्ये अपिल दाखल केलेले आहे. जे आता सुनावणीसाठी पेन्डिंग आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही जागृती अपार्टमेंटबद्दल बोलता. परंतु, ते अंडरस्टॅण्डिंग आहे. कारण आपण टी.डी.आर देणार आहोत. त्याच्यानंतर ते हे करणार आहेत. त्यांनी आता टॉवर लावलेले आहे. तो निघेल की नाही ही शक्यता आहे. प्रशांत हॉटेलसमोर जागृती अपार्टमेन्ट आहे. तिथे आता मोबाईलचा टॉवर उभा राहिलेला आहे. तो निघेल की नाही ही शंका आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही मागच्या स्थायी समितीला केस जिंकलो असे सांगितलेले होते आणि आपण अपिलमध्ये गेलेलो होतो. परंतु, आपण केस जिंकलेलो नाही.

**रोहिदास पाटील :-**

अशा एकूण तीन केसेस झाल्या. आपण ज्या बिल्डिंगमध्ये केस लढतो. आपण त्या बिल्डरला एन.ओ.सी. देतो.

**रतन पाटील :-**

त्याच्यावर मोबाईल टॉवर महिनाभरात कसा उभा राहिला?

**रोहिदास पाटील :-**

जागृती अपार्टमेंट बिल्डिंगवर आपली केस चालू आहे. महापालिकेची केस चालू आहे आणि त्याच्यावर टॉवर लावायला मंजूरी दिली हे कसे काय?

**रतन पाटील :-**

हे काम महिनाभरात चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

याबाबत महापालिकेच्या जेवढया केसेस डिस्ट्रिक्ट कोर्टामध्ये आहेत. आपण त्या सगळ्या वकिलांना पत्र पाठवलेले आहे.

**कॅसेट क्र. २ पान नं. १ ते १०**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**तुळशीदास म्हात्रे :-**

मॅडम, आपल्या जेवढया इथल्या केसेस आहेत. त्याचा भाईंदरमध्ये एकच वकिल स्टे घेणार आहे. नाही साहेब. बाकीचे केसेस त्याला घालवता येत नाही पटवायची काम तो फार बेस्ट करतो. आणि केस त्याला काही चालवता येत नाही. आम्हांला माहिती आहे. आतापर्यंत जास्त स्टे त्याचेच आहेत. दुसऱ्या कुठल्या वकिलांना स्टे मिळत नाही.

**एस. ए. खान :-**

बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

सत्य परिस्थिती आहे.

**रतन पाटील :-**

मॅडम, या संदर्भात आपण अहवाल किंवा चर्चा कधी देणार आहात? ते सांगा. कारण आपण पुन्हा चर्चा करणार नाही आणि चर्चा करायला भरपूर वेळ लागेल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सगळे बेकायदेशीर कामे ठेवून तुम्ही ---- उभे राहता? साहेब आपल्या शहरांचे काही पडले आहे की नाही? नाहीतर आम्हांला सरळ निषेध करुन रद्द करु. शहरात जर असे बेकायदेशीर बिल्डिंग होत असतील. ----- बिल्डिंग होत असतील तर काय होणार आहे या शहराचे? लोकांना फिरायला जागा उरणार नाही. गटारे बनवायला जागा उरणार नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब आपले झाले असेल तर मी एकच मुद्दा बोलतो.

**रतन पाटील :-**

मी, माननीय विधी अधिका-यांना मागच्या वेळेला मी त्यांच्याशी चर्चा केली की मिरा भाईंदर महानगरपालिकेची भाईंदर (पश्चिम) येथे एक मालमत्ता आहे. आपल्या जुन्या प्रभाग समितीसमोर. त्या मालमत्तेला अजून महापालिकेच्या जे तेथे भाडेकरू आहेत त्यांच्याकडून अजून भाडे येत नाही. महापालिकेचे तेथे भाडे थकित आहे. महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. ते सगळे कोर्टात गेले आहे. त्याबद्दल आपल्याकउे माहिती मागितलेली होती. त्याबद्दल आम्हांला सविस्तर सांगा की महापालिकेचे आर्थिक नुकसान होते त्याबद्दल त्या केसेस जिंकून आपण महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवायला पाहिजे. तर त्याबाबत आपण काही माहिती देत असाल तर आज द्या. सांगा तुम्ही ..

**विधी अधिकारी :-**

त्यादिवशी आपल्याला सांगितले होते की माझी माहिती तयार आहे. पाहिजे तर केबिनमध्ये आला तर मी तुम्हांला सविस्तर माहिती देईन.

**रतन पाटील :-**

सविस्तर असेल तर पुढची माहिती देणार असाल तर मी केव्हाही आपल्या ऑफीसमध्ये येतो माहिती द्या सांगा आम्हांला.

**विधी अधिकारी :-**

मी सविस्तर माहिती देईन.

**शशिकांत भोईर :-**

(प्रकरण क्र. १८२ चे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब या प्रकरण क्र. १८२ च्या बाबतीमध्ये आपली या विषयामध्ये बरीच चर्चा झाली आहे. उशिरा का होईना मा. स्थायी समितीसमोर अशाप्रकारचा प्रस्ताव मी सादर केलेला आहे. त्यामध्ये उद्देश फक्त एवढाच आहे की, एक आयुक्त म्हणून मला प्रत्येक दिवशी मला इकडे जे कामकाज करावे लागते. तर एवढी आपल्या महानगरपालिकेमध्ये डिपार्टमेंटस आहेत तर प्रत्येक डिपार्टमेंटची संपूर्ण जबाबदारी ही आयुक्तांची असते. आणि आयुक्तांना मदत करण्यासाठी याठिकाणी उप-आयुक्त आहेत, सहा-आयुक्त आहेत किंवा क्लास वर अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे इतर विभागामध्ये विभाग प्रमुख म्हणून काम करत असतात. जे कायद्यामधल्या तरतुदीप्रमाणे जे अधिकारी आयुक्तांकडून ह्याच्यापूर्वी परस्पर दिले गेले. खरं म्हणजे तसे न होता हे मा. स्थायी समिती समोर यायला पाहिजे होते. मा. स्थायी समितीच्या मान्यतेने अशाप्रकारच्या अधिकार हे प्रदान करणे आवश्यक होते. ठिक आहे. उशिरा का होईना हा प्रस्ताव आलेला आहे. माझी आपल्या सभागृहाला विनंती राहील की एकटा आयुक्त प्रत्येक ठिकाणी जावू शकत नाही. त्यामुळे आयुक्तांना मदत करण्यासाठी या ठिकाणी जे-जे अधिकारी कार्यरत आहे. त्या अधिका-यांना त्यांच्या सोईप्रमाणे आणि प्रशासनाच्या सोईप्रमाणे हे अधिकार प्रदान करणे अत्यंत आवश्यक आहे. मी आपल्याला नम्र विनंती करीन की, अशाप्रकारचा उशिरा का होईना प्रस्ताव सादर झालेला असला तरी आपण त्याला मान्यता द्यावी. की जेणेकरुन मला माझ्या वरच्या ज्या काही जबाबदा-या आहेत किंवा मला जो काही, जेवढा वेळ नागरिकांना, नगरसेवकांना देता येईल किंवा या शहराच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मला जेवढा जास्तीत जास्त वेळ देता येईल तेवढा वेळ देण्याचा प्रयत्न मी या ठिकाणी करिन. मी प्रत्येक ठिकाण्ी प्रत्येक डिपार्टमेंटला जर फक्त सगळ्या ठिकाणी जावूच शकणार नाही हे आपल्याला तर माहितीच आहे. त्यामुळे या संदर्भामध्ये मला आपल्याला एक विनंती करावीशी वाटत्े की, जे कायद्यामधल्या तरतुदीमध्ये कायद्याचे जे अधिकार आहेत. कायद्याच्या ज्या तरतुदी आहेत. त्या तरतुदीप्रमाणे आयुक्तांकडचे जे कामकाज असतील तर ते माझ्या इतर सबऑर्ड्रीनेट अधिका-याकंडे वर्ज करण्याची आपण कृपया मला मान्यता द्यावी.

**रोहिदास पाटील :-**

साहेब आता आम्ही तुम्हांला प्रश्न विचारतो. याच्यावर आम्हांला जास्त चर्चा करायची का? विरोध करायचा कारण नाही. विषय जरी आणला असेल तरी चांगला आहे. उशिरा जरी आणला असेल तरी चांगला आहे. उशिरा आपण देतो. आणखी वेगळे शब्दही वापरायचे कारण नाही. पण असे तुम्हांला कुठपर्यंत वाटते की जसे विधी अधिकाऱ्यांना तुम्ही अधिकार दिले नव्हते. ते आज तुम्ही प्रदान करायला या स्थायी समितीची मंजूरी घेतात अशा आणखी किती अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

अधिकार दिलेले आहेत. तेच सांगतोय. अधिकार दिलेले आहेत आणि प्रशासन चालवताना या सगळ्या गोष्टी करणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी त्याचसाठी तुम्हांला विचारतोय. ---- विषय आणला. त्याच्याशिवाय आणखी उप-आयुक्त आणखी खाते प्रमुख आणखी कोणी बाकी असतील त्यांना देणे गरजेचे आहे. गरजेच असेल तर पुढच्या मा. स्थायी समितीमध्ये सरळ एकत्र घेऊ द्या. ह्यांना हे अधिकार दिलेले आहेत आणि साहेब त्याच्या पलिकडचे आम्ही सांगतो की आम्हांलाही ते सरप्राईज होते. आम्हांला त्याच्यामध्ये जरसुद्धा हस्तक्षेप करण्याची इच्छा नाही. पण आज अमुक अधिकारी या खात्यांत आहे तर ते अधिकारी उद्या त्या खात्यांत आहे. कालचे ते बोलायला तयार नाही. वरच म्हणतात माझ्या लक्षात नाही. मी काही जबाबदारी नाही. अशा ज्या तुमच्या अंतर्गत बदल्या होतात. ज्याच्यामुळे नगरसेवकांना काम करणे अडचणीचे होते. मा. स्थायी समितीच्या सदस्यांना काम करणे अडचणीचे होते. तर सामान्यांची किती अडचण होत असेल? त्याला पण काही नियमन असतील की नाही? तुम्ही आपण काही आपण त्यांना आणखी काम सोपे होण्यासाठीच आपण प्रयत्न करतो आहोत की साहेब तसे जर असेल आता कोणत्या --- लगेच माहिती पडतील की या अधिकाऱ्यांची बदली झाली. या खात्यांत ते नाहीत. त्यांना ते अधिकार नाहीत ते कालचे काहीच बोलायला तयार नाहीत. मी त्या खात्यांत नाही.

**मा. सभापती सो. :-**

त्या बदल्या साहेबच करतात. त्यांना विचारा ना.

**रोहिदास पाटील :-**

साहेबच करतात म्हणून मी तुम्हांला सांगतो. मी कामाचे कामकाज सोपे होण्यासाठी आता मॅडमना वाटत असेल की मला आज अधिकार मिळालेत. मा. स्थायी समितीने आणखी त्या कामाला उत्साहाने काम करतील चांगलेच काम होईल असे आपण धरुया. तसे अन्य कोणत्या अधिकाराला अधिकार पाहिजे आहे नसेल तर साहेब तुम्ही बघा मी तुम्हाला उदाहरण देतो. आम्ही बोलतो आमच्या मनात दुसरे काही नसते. कोणावर आरोपही करायचा नसतो. सभापती --- तयार नसतात. तुम्ही सांगितले कोणी तेही नाही. कारण त्यांच्या मनात दुसरे कोणी नाही. पण कोणत्याही कामाचे ऍकझ्युकेशन हा विषय येतो की नाही. साहेब अत्यंत नको तो प्रसंग ओढवून वेस्टन हॉटेलच्या नात्याचा विषय आला असता पावसाळा किती दिवस राहिलं? आजच्या घटकेला जर कोण जबाबदार? बांधकाम सांगते आमचे काम नाही. आरोग्य सांगते आमचे काम नाही. तुम्ही सांगितले तुम्ही सांगता आता आपण काम करुया हे काय करुया साहेब? एकही ओळीचा अक्षर पुढची घटना पुढे-पुढे सरकलेली नाही. एक ओळ नाही. सांगा तुम्ही ह्याच्यावर काय निर्णय घ्याल? कोण निवेदन करील? वेस्टन हॉटेलच्या पाण्याचा प्रश्न उद्या पाऊस पडला की लक्ष्मीबागपर्यंत बुडणार आहे. एका सभेमध्ये एक विषय एखाद्या महासभेमध्ये किंवा मा. स्थायी समितीत किती वर्षे राहणार? कितीवेळा आणायचा कुणीही निवेदन करावे मी तुम्हांला अजिबात दोष देत नाही. पण तुमच्या जी खरी सब ऑड्रीनर ची जी बॉडी आहे ती काय काम करते? हे प्रत्येक वेळी साहेब तुम्हांलाच विचारायचे काय? आम्हांलाही कसेतरी वाटते की आपण पुन्हा पुन्हा जातो इथे बोलतो एकच विषय घेवून जातो. त्याचे कुण्ी सांगावे. या घटकेला आता इथे बजेट संपले. जो मे महिन्यात सॅक्शन होईल. जूनच्या पहिल्या आठवडयात नाहीतर २५ मे ला पाऊस पडेल की परत पुढलं वर्ष येणार तुम्ही कुणालाही ते सांगतील.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पावसाळयात अंत्य आवश्यक सेवा असते. ----- मंजूर करुन द्या.

**रोहिदास पाटील :-**

१ऽ काम होईल. आपण जे सांगतो कार्यतर मंजूर म्हणा काहीही म्हणा ही सभा कोणीही तुम्हांला अडचण आणत नाही. मी ज्या दिवसापासून स्टॅडिंगमध्ये आलो. मला असे वाटले नाही की कोणत्याही नगरसेवकाने किंवा चला हे श्री. परशुराम म्हात्रे च काम आहे. त्याला श्री. रोहिदास पाटीलने विरोध केला. हे श्री. रोहिदास पाटील ह्यांच्या संबंधित काम आहे. त्याला श्री. ध्रुवकिशोर पाटीलने विरोध केला असे कोणतेच नाही. मग साहेब काम पुढे का होत नाही? आपले पैसे संपतात. काम पुरे होत नाही. लोक आपल्याला ओरडतात. तेव्हा आपणही सगळे त्यावर सहमत होतो की खरोखरच लोकांची गैरसोय झाली. सांगा कुणाची विचारायची. दोन-तीन वर्षाची ---- साहेब एकाने तरी उत्त द्यावे की वेस्टन हॉटेलच्या नाल्याबाबत जेवढे रामायण घडले. आता कुठे ते कोणत्या स्टेजला आहे? खरोखर नाला खोदलेला आहे, खोदणार आहात? त्याचे बांधकाम निघाले इस्टीमेट निघाले, मार्किंग झाले, पार्टीशियन झाले.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी जे मुद्दा उपस्थित केलेला आहे. वेस्टन हॉटेलच्या बाबतीमध्ये जेव्हा पावसाळ्यामध्ये त्या ठिकाणी मी गेलो. आणि त्या ठिकाणी श्री. रोहिदास पाटील साहेबही आले होते. वेस्टन हॉटेलच्या साईडनी आपण कच्चा नाला खोदला होता आणि त्या कच्च्या नाल्यातून जे जमा झालेले पाणी होते. त्याचा निचरा झालेला होता. हे सतत दोन वर्ष आपण त्याप्रमाणे कारवाई केली. ही कारवाई कायम स्वरुपी त्या ठिकाणी राहिल. त्याच्यासाठी मी संबंधित बांधकाम विभागाशी चर्चाही केलेली होती की त्याठिकाणी आपल्याला कायमस्वरुपी अंडर ग्राऊंड पाईप टाकता येतील का? तर ते तुम्ही टाकून घ्या. त्यांना मी हे सुद्धा सांगितलेले आहे. आणि त्याच्यावर त्यांनी भराव करावा आणि पाण्याच्या त्याठिकाणी फक्त निचरा व्हावा. मिनव्हाईल जवळ-जवळ दोन-तीन आठवडयापूर्वी नॅशनल हायवेचे जे इंजिनियर आहेत. श्री. आपटेसाहेब हे माझ्याकडे आलेले होते आणि त्यांच्याशी मी याबाबतीमध्ये चर्चा केलेली असताना त्यांनी तो प्रस्ताव हा त्यांच्या नॅशनल हायवे ॲथोरिटीने मंजूर केलेला आहे. आणि ---- रोड त्यांनी त्याठिकाणी प्रस्थापित केलेला आहे. तर हा --- रोड प्रस्थापित करत असताना त्यांनी ओव्हर ब्रिजसुद्धा प्रस्थापित केलेला आहे. आणि ज्या-ज्या ठिकाणी कनव्हरटस बांधणे आवश्यक आहे. त्या त्या ठिकाणी कनव्हरटस सुद्धा बांधण्याची प्रोव्हिजन त्याच्या इनस्ट्रमेंट मध्ये केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब आपण त्याचे स्वागत करु. पण ते आज जे बोलले असेल ते उद्या होईल असे नाही. पण उद्या पाऊस येईल हे नक्की पाऊस तुम्ही थांबवू शकत असे नाही. याला आपण अन्य कामांत जसे एक्स्टेशन घेतो किंवा आपण --- करतो. पाऊसाचे करु शकणार नाही ना. पाऊस पडायच्या आधी तुम्ही आतातरी निर्देश द्याल का? तो नाला खोदून ठेवा १५न१० १५ फुट रुंद. १० फूट खोल असे पाईप लाईनची लेव्हल ठेवून नाला खोदला होता आणि मोठया प्रमाणात तिथे पाणी निघत होते साहेब आता ही खोदलेला नाही. श्री. आपटे यांचा संबंधच नाही ना. श्री. आपटे ची ब्रॉन्ड्री वेगळी. आणि आपली बॉन्ड्री वेगळी आहे. आपण जे आग्रह धरतोय. ते तुम्हांला सामील करणार विनंती करतोय की आपल्या बॉन्ड्रीतले आपण म्हणतोय. आपली बॉन्ड्री आणि त्यांची बॉन्ड्री ते पाणी निघायला पाहिजे. नाहीतर पाऊस परत येतोच. त्याचे निर्देश द्या ना.

**मा. आयुक्त :-**

या बाबतीमध्ये मी संबंधित बांधकाम विभागानेच ते काम प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग ते श्री. खांबित साहेबांनी करावे, बांधकाम विभागाने करावे किंवा आरोग्य विभागाने करावे.

**मा. आयुक्त :-**

बांधकाम विभागानेच ते काम प्रस्थापित करणे आवश्यक आहे आणि बांधकाम विभागालासुद्धा अशाप्रकारचे इनस्ट्रक्शन मी यापूर्वीच दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

काय केले ते सांगा. आमचे श्री. खांबित साहेब नेहमी असे आडवे-तिडवे धावत असतात. त्यांनी आता सांगावे.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडून चार दिवस आधी कामाचे आदेश आलेले आहेत. माझे सगळे इंन्स्ट्रुमेंट असते. त्याच्यावरती पण काम होईल. पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचे

**एस. ए. खान :-**

पाठीमागे नाला नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हॉटेलच्या पाठीमागून आपल्याला नाला आहे ते पहिले तुम्ही मला सांगा.

**एस. ए. खान :-**

पाठीमागे नाला नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण जो नाला खोदला आहे तो हायवेखालून आलेला आहे की नाही? तिथे ती उघाडी.

**एस. ए. खान :-**

उघाडी आहे. बरोबर आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तिथून परत वळून घेतलेला आहे. ---- ती वरुन खोदायची वरून खोदायचे माझा विचार आहे की श्री. खांबित साहेब त्यापेक्षा तिकडे एक मोठी उघाडी बनवा सारखी उघाडी बनवा एवढी मोठी ----

**मा. आयुक्त :-**

वेस्टन हॉटेलच्या भागामध्ये फ्रॅन्टला एकच मोठा पाईप आहे. आणि त्यांचा दुसरा पाईप हा चॉकअप झालेला होता. मागच्या वर्षी तो खोलला.

**जयंत पाटील :-**

तो खोलला की नाही. तिथून सरळच न्यायचा.

**कॅसेट क्र २**

पान क्र. ११ ते २९

**रतन पाटील :-**

लाईट नाही आपल्या सोयीनुसार प्रत्येकाने -------------- गेलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ६४ मध्ये याचा सर्व्हे झालेला त्यावेळी इथे जे होते ते----------------- जेव्हा कोणतेही बांधकाम नव्हते . त्यावेळी तिकडे पाच नाले ठेवले गेले आणि आता आपण बुध्दीवंतांनी ते नाले सगळे बंद केले. सगळे डिग्री ल्लोडर झाले म्हणुन.

**मा. आयुक्तः-**

क्रॉसींग चे नाले म्हणता ना?

**रोहिदास पाटील :-**

क्रॉसींग चे नाले पुर्ण हायवेतुन आलेले पाणी शेतातुन जायचे जे शेतातुन जायचे ते वहिवाटीचे नाले म्हणुन होते. हे नाले तसे नसतात. -------------- नसतात. -----------------
जर तुम्ही महसुलचा रेकॉर्ड काढला तर त्याचा उतारा येईल. उतारा ----------- श्री. स्टीवन सेटचा येईल. श्री. हरेश पाटील साहेबांचा येईल, श्री. म्हात्रे साहेबांचा येईल कोणाचा ही येईल. श्री. म्हात्रे साहेबांचा येईल आणि तेथुन पाच झाले. पाच नाल्यांच्य ठिकाणी दोन नाले काम करतात. काय आपण कूठे उगाचच विषय -------- आता जेव्हा साहेब ----------- होईल फायनल किती ---------- होईल ? ------------

**मा. आयुक्त :-**

६८ त्यांनी जो प्रस्थापित केलेला आहे त्याच्यामध्ये तुम्ही जे म्हणताय. त्याठिकाणी त्यांनी कनव्हटची व्यावस्था केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुमच्या आणि माझ्यात थोडेसे मिस अंडस्टँडिंग होत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हायवेच्या अधिकारी ------------ झालेला. असे ते बोलले.

**मा. आयुक्त :-**

तेच तर मी सांगतोय.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ते मोठ्या प्रमाणावर करतात.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्यात आणि माझ्यामध्ये थोडा बदल होता. थोडासा फरक आहे.
हायवे - हायवेच काम करील. हायवेने -------------- त्या मोरीच्या कॅपेसीटीच्य दीड पट ही मोरी जर ६गुणीले ६ ची असेल ६ चा जर एरिया --------- त्याच्या दिड पटीच तिच स्लॅब --------------- आर. सी. सी. बनवा ---------- बनवा एकच मोठा पाईप आणा की दहा टाकायचे आमचे कर्तव्य नाही. पण जे पाणी पुर्ण बाहेर नीघायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

-----------------------------------

**रोहिदास पाटील :-**

आणि ते हॉटेल तुम्ही --------- नुकसान करत नाही.

**तुळशीदास पाटील :-**

हॉटेल वाला कोण आहे?

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला त्या हॉटेलची काळजी आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य. श्री. रोहिदास पाटील साहेब, ती जागा खाजगी आहे. त्याचे परमिशन कोण देणार ?

**रोहिदास पाटील :-**

अहो, जागा खाजगी परमिशन . तुम्ही पुस्तक वाचु नका.

**मा. सभापती :-**

मी तूम्हाला विचारतो.

**रोहिदास पाटील :-**

परमिशन कोण देईल याला साहेब उत्तर देतील. ---------- श्री. खांबित साहेबांना माहित नाही. श्री. खांबित साहेब मा. सभापती साहेबांना सांगतात. मा. आयुक्त साहेब उत्तर देतील. नाहीतर मा. नगरसचिव उत्तर देतील. श्री. खांबित साहेबांना तेवढा कायदा पाठ नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, या संदर्भात बोलू इच्छितो. मध्यंतरी ----------- नॅशनल नाले होते. अगोदरचे म्हणजे जेव्हा गाव एरियात श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सुचना दिलेली ए.डी.टी.पी. विभागाला की,

ए.डी.टी.पी. च्या नकाशामध्ये नाले दाखवलेले नव्हते. त्यावेळी ते नकाशात दाखवलेले असे दाखवलेले आमच्या आगरी समाजामध्ये ते वधार असे बोलतात. अगोदर -------- ते दाखवायची गरज होती. ते ए.डी.टी.पी. विभागाला दाखवणार होते. त्याचे काय झाले ते पहिले विचारा.

**एस. ए. खान :-**

अतिहुशार श्री. शिंदे साहेब आपल्याकडे होते. त्यांना मी स्वतः नेउन दाखवले होते.

**शशिकांत भोईर :-**

श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी त्याच्यावर चांगले वक्तव्यपण केले आणि त्यांना मागणी केली दाखवा नॅशनल ----------- कुठे आहेत ते?

**तुळशीदास म्हात्रे :-**

----------- यांनी वधारी रस्त्याच्या बाजूला कुठे केली आहे? वधारी केली दुस-या जवळपासच्या लोकांनी खाली. -------------------

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेबांनी वेस्टन हॉटेल त्याबाबतीत प्रश्न उपस्थित केलेला होता. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे २ वर्षे त्याठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी जे.सी.बी. ने आपण त्याठिकाणी कच्चा नाला खोदला. परंतु, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब आपण त्याठिकाणी कायमस्वरुपी मागणी करत आहात. तर कायस्वरुपी जेव्हा आपण एखादे काम जर आपल्याला करायचे असेल तर त्या खाजगी जागेवाल्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे किंवा त्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही बोलता ते बरोबर आहे. पण साहेब आज विषय आला ना. मग तुम्ही ते सांगता ते चुकीचे काहीच नाही. दोन वर्षापासून विषय चालतोय ना. दोन वर्षापासून तुम्हाला त्यांना बोलवावे असे का वाटले नाही? असा विषय आहे ना.

**मा. आयुक्त :-**

मी तेच सांगतोय. कायमस्वरुपी जर त्याठिकाणी समजा आर.सी.सी. पाईप टाकायचा असेल. तर त्यांना मी पुढच्या आठवड्यात बोलवतो. त्यांच्याशी चर्चा करतो.

**रोहिदास पाटील :-**

पाणी निघायला पाहिजे, पाणी काढा.

**मा. सभापती :-**

जरुर पाणी निघेल.

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र.१८२ चे वाचन केले.)

(ठरावाचे वाचन केले.) तरी सदर ठरावाची अंमलबजावणी ताबडतोब करण्यात यावी.

**रतन पाटील :-**

मागे आपण काहीतरी दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यावेळी मागे काहीतरी दिलेले आहे म्हणजे त्याच्यात काय दिलेले आहे?

**शशिकांत भोईर :-**

जे निर्णय लागलेले आहेत. बघा, परत एकदा विचार करा. निकाल लागलेले दावे, याचिका मागे घेणे, म्हणजे दावे अलग, निकाल लागलेले दावे आणि याचिका मागे घ्यायची असेल ज्याचे निकाल लागले असतील अशांचे दावे आपल्याला मागे घ्यायला लागतील.

**दिपक खांबित :-**

ही सेटलमेंटची केस आहे. आपण ज्या सुनावण्या होतो ना --------------

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे बॉबलीक आहे. कॉमा, कॉमा करायलापाहिजे होता.

**रोहिदास पाटील :-**

दुरुस्त करा.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब पाहिजे तर पुन्हा वाचतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**दिपक खांबित :-**

---------------------------------

**शशिकांत भोईर :-**

नाही नाही त्याच्यावर सविस्तर गोषवारा आला कोणत्या अधिकारा साहेब आम्ही तुम्हाला सांगतो वेठीस पकडले नाही. पण ते रितसर येउद्या बघा आता विधी सल्लागारासाठी आपण हा विषय आणलेला तसा सविस्तर विषय येउ द्या. आम्ही मान्यता देतो. कोणत्या अधिकाराला काय द्यायचे? आता चार वर्षात आमच्याही निदर्शनास आले आहे की, अधिकारी कोणते?

**दिपक खांबित :-**

---------------------------

**रतन पाटील :-**

कलम ६९ च्या माध्यमातून येउद्या.

**दिपक खांबित :-**

------------------------

**शशिकांत भोईर :-**

साहेब तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. त्यांनी दिलेले आहेत ना. जे कोणाला द्यायचे आहे ते त्यावेळी मा. स्थायी समिती ठरवेल ना. जेव्हा येईल तेव्हा.

**रतन पाटील :-**

साहेब, ठराव ६९ च्या माध्यमातून येउ द्या.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही जे वक्तव्य करताय की, कायद्यामध्ये जे अधिकार मा. आयुक्तांनी प्रदान करणे आवश्यक आहे त्याला फक्त मा. स्थायी समितीची मान्यता घ्यायची आहे. मा. स्थायी समितीने मा. आयुक्ताने अधिकार कोणाला द्यायचे हे मा. आयुक्त ठरवतील. फक्त तुम्हाला जो रिस्पेक्ट द्यायचा आहे तो रिस्पेक्ट देवूनच ते करायचे आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण मान्यता द्या. पण ६९ कलमानुसार ते येउद्या. या स्थायी समिती समोर आल्याशिवाय आपण द्या. आपलाच अधिकार आहे. पुढे तर येउ द्या.

------------- :-

ते सगळेच झालेले आहे.

**प्रकरण क्र. १८२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१) व (२) नुसार अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. :-**

**सुचक :- श्री. रविंद्र माळी** **अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८३ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

पाणी पुरवठ्याचे निवेदन कोण करेल? ते पहिल्यांदा सांगा. ---------- पूर्वेला किती तासाने पाणी येते असे काही आहे का? -------- साहेब किती तासाने पाणी येते याचे काही निवेदन आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. भाईंदर पूर्वेला गोडदेव हा ३६ तास, ३८ तासांवर पाणी पुरवठा आहे. आणि बाकीचा २७ तास, २८ तासांवर पाणी पुरवठा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, बघा आम्ही ३८०० बोललो ते मिनीमम बोललो. मॅग्झीमम ४० तास ४२ तासांवर जातो. म्हणजे साहेब दोन दिवसांनी एक दिवस पाणी यायला लागले विचार करा. त्याचवेळी महापालिका हद्दीमध्ये काही विभागामध्ये २४ तासांत पाणी येते. पूर्वेमध्ये आज ४० तास, ४२ तासाने पाणी येते. तेही पाणी देतेवेळी यांच्या रेकॉर्डवर ३८ तास ४० तास लिहले जाते. वस्तुस्थिती समजून घ्या. कित्येक दिवस आपण सांगतो त्याचे कोणत्याही अधिका-याने ते करायचे आहे की जेव्हाही पाणी दिड तासांतच सोडतात. एक तर त्या पाण्याच्या टाकीवर केबल नसते. सोडलेले पाणी. पहिले सुरुवातीच्या लोकांना मिळते. एन्ड एन्डच्या लोकांना मिळत नाही. लोक रोज पाणी - पाणी करतात. हे समजा पाणी सोडले एक तर पाणी सुटते ३६ तास ,३८ तास,४२ तासांनी आता एकदा गेले की दोन दिवसांनी येणार लोक धिर कसे धरणार तुम्ही सांगा ना

त्यांची आपल्याकडे व्यवस्था काय आहे ? हे पाणी भाईंदर पुर्वेच्या लोकांना पोहचेल. लोकांना पाणी २७, तासांने देतात. ते भले ३० तासांनी द्या ३२ तासांनी द्या पण ३२ तासांवरुन ४२ तासांवर जाते असे रोज चाललेले आहे. प्रत्येक मा. स्थायी समितीमध्ये चर्चा होईल . निघुन जाणार.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब तुम्ही याच्यावर स्पोसीफिक बिल्डींगची नावे जर सांगितली तर ते मी सांगेन कुठल्या एरियाला किती वेळ पाणी जाते? भाईंदर पुर्व म्हणजे आता २४ तासांवर ही आहे,२७ तासांवर पण आहे. म्हणजे असा सगळाच एरिया.

**रोहिदास पाटील :-**

सुजाता मध्ये पाणी किती वेळ जाते? ------------

**शिवाजी बारकुंड :-**

सुजाता मध्ये आता हे ३० तासांच्या आतमध्ये आलेले आहे. ज्यावेळी शटडाउन होतो. मागच्या वेळेला ३२ तासांचा शटडाउन झाला. तो रिकव्हर होण्यासाठी १५ दिवस लागतात.

**रोहिदास पाटील :-**

अहो पाणी कुठे जाणार? शंभर , हजारो लोकांनी आता मोटर लावली हे काही मोटर आता आहेत का? ते महत्वाचे आहे तुम्ही बोला. कोणावर आरोप करायचा विषय नाही. हा एक्झीबीशनचा विषय आहे. कार्यवाही करण्याचा विषय आहे. याच्यात सगळे --------- चर्चेचा विषय आहे. किंवा लोक पाणी खेचतात.

-----------

येथील काही लोक सुखाने राहतात तर काही लोक दुःखाने राहतात

------------

-------------

**रोहिदास पाटील :-**

मग त्याच्यावर ही सभा ज्यांनी पंप लावले त्यांच्यवर कार्यवाही करण्याची मागणी करते का?

---------

तसे लेखी द्यायचे. मा.आयुक्त साहेब तशी तुम्हांला

**रोहिदास पाटील :-**

तशी परवानगी पाहिजे असेल तर मा. आयुक्त साहेब, मा. सभापती साहेब तुम्हाला देतील आपण त्यानां काय म्हणतो. की जर त्यांना एक्झ्युकीटीव्ह ना मंजुरी पाहिजे असेल तर मा. आयुक्त साहेबांची मंजुरी पाहीजे असेल मा. सभापती साहेबांची मंजुरी पाहिजे असेल मा. स्थायी समितीची मंजुरी पाहिजे असेल किंवा ज्यांनी पंप लावले आहेत त्याच्यावर कार्यवाही करण्याची परवानगी द्या काहीतरी कराल की नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

उद्यापासुन त्याच्यावर कार्यवाही होईल ज्यांनी पंप लावले असतील त्यांचे कनेक्शन पण बंद करुया.

**रोहिदास पाटील :-**

महानगरपालिका कूठेतरी काम करते असे कळु द्या .

**रतन पाटील :-**

साहेब, तुमचे अभिनंदन करतो पण उद्या बोलण्यापेक्षा आज पासुन बोललात तर फार चांगले होईल .

**मा. सभापती :-**

आज पासुन बोलतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

आजपासुनच करा,

**प्रकरण क्र. :-**

**ठराव क्र. :-**

**सुचक :- श्रीम. जेन्वी अल्मेडा** **अनुमोदन :- श्रीम. गीता जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

( नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८३ चे वाचन केले. )

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ----------- पाण्याच्य टाकीवरचे प्रेशर तुम्ही थांबवता पाण्याच्या टाकीवरचे प्रेशर २.७,२.८ मेन्टन करण्यांसाठी एकतर एकझ्युटिव्हला जबाबदार धरा किंवा नाहीतर त्यांचे डेपुटी आहेत. त्यांना जबाबदार

पकडा कोणाला तरी जबाबदार पकडा की तुम्ही मला रिपोटींग केले पाहिजे. प्रेशन मेंनटेन केले तर साहेब कोणालाही डिस्टब होणार नाही जे २.३ श्‍ते. २.४ येत २.३,२.४ आले की, ७०७ येईल. मग, त्यांच्य टाकीला पाणी चढत नाही. घोडदेवच्य पाण्याच्य टाकीला पाणी चढत नाही. कमला पार्क च्य टाकीला पाणी चढत नाही. सगळे झोन डिस्टब होतात. एकाचवेळी सगळे व्हॉल ओपन केले की, ह्यांना व्हॉलमॅन लागते. व्हॉल ओपन करण्यामध्येय त्यांची छाती दुखते .एकाच वेळी ते व्हॉल ओपन करतात. एक - एक करुन ते बंद करा म्हणजे टाकीची लेव्हल मेन्टेन केली जाईल. म्हणुन पाणी तेवढे येत नसेल, हे कोणाला विकत नाही. त्यांच्यवर आपण आरोप करत नाही. सिस्टम मेन्टेन करत नाही. सिस्टम मेंन्टर करण्यासाठी मा. आयुक्त साहेब, त्याला जबाबदार धरा मा. आयुक्त साहेब तुम्ही किंवा मा. उप आयुक्त साहेब त्याला जबाबदार धरा. मा. आयुक्त साहेब, तुम्ही श्री. बारकुंड साहेबाना जबाबदार धरा. की, मी तुम्हाला विचारणार नाहीतर तुम्ही त्यांना सांगावे --------------- जवळ दिलेले आहे हे प्रेशर जे आहे डेव्हलप करायचे आहे, मेन्टन करायचे आहे. यु आर रिस्पॉन्सीबल असे म्हटले साहेब बघा लाईन मध्ये येते की नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

दुसरी गोष्ट मी काय बोलतो पुढची मा. स्थायी समितीची मिटींग लागे पर्यंत कार्यकारी अभियंता श्री. बारकुंड साहेबांनी यांनी शंभर मिटर पकडुन आणल्या तर इतिवृत्तांताचे आपण सर्वांना त्यांचे स्वागत करुया.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, मला मा. स्थायी समिती समोर बोलु द्या माझ्याकडुन काम करुन घेतात. ----------- सगळा काढा. मी महानगरपालिकातुन बाहेर गेलो तरी चालेल परंतरु प्रत्येक जण आम्हाला ह्या महापालिकेमध्ये एवढा दाबायचा प्रयत्न करतात. आम्ही माणसे आहेत. आम्ही कोणाचे घरगुती नोकर नाही. आम्ही कोणाचे खाजगी नोकर आहे का?

------------

-----------------

माझ्या बद्दल बोलायचे नाही.-------------

**शिवाजी बारकुंड :-**

मी वैयक्तिक बोलत नाही पुर्ण महानगरपालिके --------------

**मा. सभापती :-**

त्यांच्यावर आले आहे ना. ते काम करुन घेतात त्यांच्य कडुन मग असे करतात.

**शिवाजी बारकुंड :-**

२४ तास सेवा देण्याचे काम आमचे आहे . मी भाईंदर शहरांत राहतो. अर्ध्या बादलीत मी पण आंघोळ केली. मला माहिती आहे पाण्याचे काय आहे ते. पण प्रत्येक जण जर आप - आपसांत राजकारण करुन आम्हांला दाबायचा प्रयत्न करत असतील तर हे चुकीचे आहे चार्ज कोणाला --------------- सगळ्याच गोष्टी वेगळ्याच गोष्टी वेगळ्या आहेत. प्रत्येकाची कामे करुन देण्याचे प्रयत्न माझा आहे. पण, प्रत्येक जण जर आम्हांला दाबत असेल तरी आम्ही पण माणसे आहोत. कधी पण -------- आणि काही दाबायचे प्रयत्न करुन एवढा.

**जयंत पाटील :-**

पाण्याचा विषयच असा आहे. तुम्ही समजुन घ्यायला पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, असे नाही समजुन घेतो. मी कधी नाही म्हणालो रात्री बारा वाजता फोन केला तरी मी गेलेलो आहे. तीनला केला तरी गेलेलो आहे. म्हात्रे साहेब त्यांना सांगा ------------ लगेच बोलतात खोट बोलतात का? आमचे लोकांच्या घरचे नोकर आहेत का? कधीही ते सांगतात श्री. बारकुंड साहेबांना सांगा मी त्यांचा नोकर नाही. मग आमच्या घरचे लोक आहेत का ह्यांचे ? मी महानगरपालिकेचा नोकर आहे. महापालिकेचा पगार मी घेतो माझ्या घरचे घेत नाही. हे प्रत्येकाने --------------------

-----------

**मा. सभापती :-**

सहकार्य करावे ना. बरोबर आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही आमची चुक झाली त्याच्यावर कार्यवाही करा. बोलण्याची पध्दत आहे. प्रत्येक जण एवढे सुसंस्कृत लोक आहेत ऐवढे त्याप्रमाणे वागा ना. तशा आमच्यापण अपेक्षा आहेत ना.

**मा. सभापती :-**

घरापर्यंत न पोहोचता कामा.

**ग्रीटा फॅरो :-**

त्यांची पण फॅमेली आहे ना. ----------------

**शशिकांत भाईर :-**

मा. सभापती साहेब, याच्यावंर मी बोलु इच्छितो . श्री. बारकुंड साहेबांच्या घरी कोणी बोललेले असेल तर ती वेगळी गोष्ट आहे. पण मी माझ्या आक्षेपांचे पत्र मा. आयुक्तांच्या नावाने त्यांच्य कडे दिलेले आहे. ज्यावेळी प्रभागात काम करतात. संबधीत नगरसेवक असतत. त्यांना विचारणे गरजेचे आहे ना. माझ्या समोर सर्व अधिका-यांना इंनस्ट्रकशन देतात की, असे असे करायचे त्यांनतर कोणाच्या तरी दबावाखाली जाउन कामे होतात. आम्हाला माहित नसते आमच्य वार्ड मध्ये कधी काम चालु असते. आम्ही वारंवार त्याला तोंडी . आता लेखी तक्रार देत चाललेलो आहोत. मग त्याचे होउ नये का? आम्ही न सांगता आम्ही निर्देशनास आणले अगोदर पाईप लाईन टाकलेली आम्हांला माहिती आहे पण, ती वारंवार संबधित खात्याच्या अधिका-यांना विचारणा केली तर ते म्हणे इथे काही योजना तर ते म्हणे इथे काही योजना होणार नाही आणि माझ्या नकळत मी शनिवारी बाहेर होतो. तर तिथे एक पाईप लाईन टाकुन मोकळी ही झाली. तेव्हा त्या संबधातीनां कळवायची गरज नाही. जेव्हा ते पाणी बंद होईल तेव्हा बरोबर सांगतात आता पाणी बंद होईल. माझ्याप्रभागाच्या परिसरामध्ये गेल्या कित्येक महिन्यापासुन ४८ तास ते ४० तासामध्येच पाणी नसते.आणि २४ तासांवर आले नाही. मग, आमच्या जनतेने काय करायचे? आमची जनता सुखी आहे का? कुठे कुठे कोणत्या तरी क्षेत्रामध्ये २४ तासांमध्ये पाणी जाते. तीथे तुम्ही २४ तासांमध्ये पाणी मिळेल पाणी मिळेल ते काही करत नाही. ते कोणी करायचे? अधिका-यांना वैयक्तिक बोलत नाही. त्या पोस्टला बोलतो. जे पण अधिका-यांनी लक्षात घ्यायचे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, आपल्या प्रभागात आपण २ महिन्यापासुन तक्रार करत होता की, पाणी पुरवठा कमी आहे. पाणी पुरवठा कमी, पुर्ण नवीन लाईन टाकायची असेल तर हे सन्मा. सदस्यांना सांगणे आमचे काम आहे ते आम्ही सांगतो परंतु आता पाणी कमी, कुठे क्रॉस कनेक्शन केल्यानंतर पाणी पुरवठा सुधारणा होईल का? हे सुध्दा कामे आम्ही आमच्या लेव्हलने करतो. टेकनिकल कामे आहेत त्याच्यमध्ये सुधारण्याच्या दृष्टिने पाणी पुरवठा सुधारण्याच्या दृष्टिने बोलतो. नविन पाईप लाईन टाकायची असेल तर त्या प्रभागातील सन्मा.नगरसेवकांना आम्ही कळवतो. पण आता सुधारण्याच्या दृष्टिने कुठे क्रॉस कलेक्शन करायचे असेल कुठे दोन पाईप लाईन टाकायचे असतील. त्याने ते करुन जर सुधारणा होत असेल तर ह्या प्रत्येक बारीक सारीक गोष्टी आवश्यक ------------------

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तसे नाही ज्यावेळी आम्ही तसे निदर्शेनास आणले की आमच्या केबीन रोड पाणी कमी दाबाने येते तेव्हा तुम्ही तिथे कधीही विचारणा केली नाही. की, इथे क्रॉंस कनेक्शन केले की, तुमचा पाणी पुरवठा वाढेल. कधी तुम्ही अशी वाच्यता केली नाही . तुमच्या मनाला वाटले म्हणुन तुम्ही करणार का?

**रोहिदास पाटील :-**

----------

**शशिकांत भोईर :-**

आता तुम्हांला तिकडे विचारले ---------

**शिवाजी बारकुंड :-**

पाण्याच्या दृष्टिने प्रयत्न करतो ना. मनाला वाटले म्हणुन नाही ना.

**शशिकांत भोईर :-**

गेली चार वर्ष झाली प्रयत्न करत होता तेव्हा तुमचे झाले नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

गेली चार वर्ष नाही याच्यामध्ये

**शशिकांत भोईर :-**

एखादा कुठला उप-या उठला आणि त्याला -----------

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, साईट आम्ही उपस्थित झालो आणि एक्स. व्हाय. झेड उपस्थित झाले. त्याला आम्ही जा म्हणुन बोलु शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

मी तुम्हाला सांगतो ना त्यांना कसे माहित की त्याच दिवशी काम चालु होणार आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

काम चालु असतानां तिथे आल्यावर काय करणार ?

**शशिकांत भोईर :-**

नाही मी वैयक्तिक बोलत नाही. जे अधिकारी पोस्ट आहे त्यांना मी बोलत आहे. तुम्हांला सांगतो हे तुम्ही आम्हांला अंधारात ठेवुन काम करता. आता पर्यंत चार वर्ष झाली मी ओरडतो तुम्ही पाणी पुरवठा का सुरु केला नाही? का पाणी पुरवठा ४८ तासांवरुन केला नाही. ३० तासांवर का केला ?

**शिवाजी बारकुंड :-**

हे ४८ तास २४ तास ह्याचा पण आम्ही पाणी पुरवठाने सर्व्हे केला आहे लवकरच मा. स्थायी समितीपुढे तुम्हांला ते प्रोजेक्टवर एल. सी. डी वर तुम्हांला दाखवण्यात येणार आहे. तूम्ही म्हणता ना काय

केले? कुणीही कुठूनही पाणी देउ शकणार नाही. जे पाणी आहे. आपल्या शहराची काय वस्तुस्थिती आहे ते सगळा रिपोर्ट तयार केलेला अहे. तो मा. स्थायी पुढे आणि मा. महासभे पुढे मांडु शहराची जी रचना आहे पाणी कुठे किती पाणी जाते हे सगळे स्टडी झालेला आहे. तो सविस्तर रिपोर्टच सादर करतो. याच्यामध्ये कुणाचे वैयक्तिक काही नाही आणि कुणाचे पाणी कमी इकडे अमुक आहे म्हणुन पाणी जास्त आणि तिकडे अमुक आहे म्हणुन पाणी कमी असा उद्देशच नाही ही आपल्या महापालिकेतली सिस्टीम आहे. पाण्याच्य टाक्यांची --------------

**कॅसेट क्र. २**
**पान क्र. ३० ते ३९**

सिस्टीम आहे. त्यानुसार हा रिपोर्ट गेलो आहे. ५० एम. एल. डी मधली कामे राहिलेली . या सगळ्याचा हे करुन तुम्हाला रिपोर्ट देतो ना.

**शशिकांत भोईर :-**

५० एम. एल. डी अंतर्गत राहिलेली कामे बंद आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

हो ती बनलेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

मग, हे आजपर्यंत का बंद आहेत. आता गोडदेव संपला चे संपला आता कुठे अर्ज आणला तुम्ही. पंपरुमचा त्या निविदा मंजुरी साठी आणल्या. गोडदेवचा संप कधी बनवणार?

**शिवाजी बारकुंड :-**

हे पहा विषय पुर्णपणे महापालिकेचा आहे. गोडदेवचा जो संप आहे हा ५० एम. एल. डी मधला राहिलेल्या कामाबाबतचा विषय आहे.

**शशिकांत पाटील :-**

तुम्ही चार वर्षात काही केले नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

का केले नाही ते सांगतो म्हणुन ते काम महापालिका ॲक्झीबुट करत नाही. ते काम एम. जी. पी ॲक्झीबुट करते. एम. जी. पी ला एम. एम. आर. डी कडुन निधी मिळाला नव्हता. म्हणुन ती कामे तुम्ही बंद केली होती मा. महासभेने ठराव करुन आपणत्यांना पत्रव्यवहार केलेला आहे. आणि त्यापध्दतीची त्यांनीकामे चालु केलेली होती. जे काम ९० टक्के झाले ते काम १०० टक्के करणार जे ९५ टक्के झालेले ते उरलेले ५ टक्के पुर्ण करण्यासाठी चालु केलेली आहेत. आणि नगरपालिका निधी उपलब्ध करुन देणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग, जी कडे सुरुच झालेली नाही. आता गोडदेवच्या टाकीचे काम अजुन सुरुच झालेले नाहीत.

**शिवाजी बारकुंड :-**

ते काम आता सुरु होतील ना.

-----------

आपण ठराव कधी केला.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, आपण प्रायरेटी कशाला दिली? आज ९५ टक्के टाकीचे काम पुर्ण झाले आहे. तिथे ५ टक्के काम राहिलेले आहे. मग, ते ५ टक्के काम पुर्ण करुन पहिल ती ----------- करायला पाहिजे. हेच काम चालुच झालेले नाही तिचे १०० टक्के काम बाकी आहे ना.

-----------

हे ९५ टक्के ते १०० टक्के सुरुच झाले नाही ते सुरुच करायचे नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण त्याबाबत पत्रव्यवहार चालु आहे. आपण निधी त्यांना देणार आहोत.आणि अपण बैठक जी आयोजीत करणार आहोत ते ३ तारखेपर्यंत त्यांचे ते चिफ इंजिनियर ---------- त्यांची मिंटीग आहे. त्यांच्यानंतर ते तारिख कळवितो म्हणाले. तिथं मा. स्थायी समितीसमोर त्यांची बैठक होणार आहे.

-----------

त्याला पण दिड महिना झाला आहे ना.

----------

तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्या. की, ही कामे महापालिकेमार्फेत जी करायची असेल तर त्याला जबाबदार आपण आहोत. जी कामे एम. जी. पी मार्फेत चालु आहेत ती कामे एम. जी. पी मार्फेत बंद का पडली ? कोणाच्या कारणामुळे बंद पडली ? याबाबतीमध्ये सर्व चर्चा ही मा. महासभेमध्ये झालेली आहे. आणि महासभेमध्ये ही चर्चा झाल्यानंतर आपण असा निर्णय घेतला की एम. एम. आर. डी. ए. करुन आपल्याला जे काही कर्ज उभे करायचे होते. ते कर्जाची रक्कम ह्याच्यापुढची त्यांचा व्याजाचा दर जास्त असल्यामुळे आपण त्यांच्याकडुन घ्यायची नाही. महापालिकेच्या निधीतुन तो खर्च करायचा आहे. आता महापालिकेच्या निधीतुन जो

खर्च करायचा आहे. त्याच्यासाठी जो काही हिशोब आतापर्यंत त्यांनी जो काही मेनटेन केलेला आहे. एकुण किती कर्ज घेतले? किती कोटी रुपयांचे कर्ज घेतले? त्याच्यापैकी एम. एम. आर. डी. ए. ने त्यांना किती कर्ज उपलब्ध करुन दिले? त्याला शासनाचे किती अनुदान मिळाले? हे सर्व आपण जोपर्यंत बघत नाही. तोपर्यंत आपण डोळे बंद करुन त्यांना पैसे देणार आहात का? नाही त्यासाठी जवळ जवळ ३ - ४ महिन्यापासुन ५ - ६ महिन्यापासुन आपण सतत ह्याच्या पाठी मागे लागलो आहोत? एम. जी. पी च्या अधिकाऱ्यांशी आपण जी वेळो वेळी चर्चा केलेली आहे. एम. जी. पी अधिकारी ह्या ठिकाणी बोलवलेले आहेत. मी कॉनट्रक्टराची मिटींग सुध्दा माझ्या चेबंर मध्ये घेतलेली आहे. आणि मी त्यांना सांगीतले आहे की, आतापर्यंत ज्या - ज्या ठिकाणी कामे तुम्ही सुरु केलेली नाहीत. ती कामे तुम्ही तातडीने सुरु करा. त्याच्यासाठी त्यांचे म्हणणे होते की, तीन कोटी रुपयांचा निधी तुम्ही आमच्या कडे वर्ग करा. तीन कोटी, सव्वा तीन कोटीचा निधी वर्ग करण्यासाठी माझे अधिकारी लेखा अधिकारी मी ठाण्याला पाठवीले त्यांच्या एम. जी. पी च्या ऑफिसमध्ये त्यांनी संपुर्ण रेकॉर्ड तपासले आणिआता त्यांनी मागच्या आठवड्यात पत्र पाठविले की, सव्वा तिन कोटी रुपये द्या आणि जो सव्वा कोटीचा प्रस्ताव हा आता तयार झालेला आहे. आणि तो मुख्य लेखा परिक्षका कडे मला वाटते काल की परवा सादर झालेला आहे. ते सव्वा तीन कोटी रुपये आपण त्यांना दिल्यानंतर ते तिथे कामाला येणार आहे. इव्हन जे काही समजा एम. जी. पी ने जे ठेकेदार नियुक्त केलेले होते त्या ठेकेदारांचे चार - पाच वर्षा पुर्वीचे जे दर होते पाईपचे दर जे आता मान्य करत नाही. त्या साठी सुध्दा मी चिफ इंजिनियर शी बोललो त्यांनी तातडीने त्या त्यांच्य ---------- इंजिनियराशी बैठक वैगरे घेतली आणि त्यांनी निर्देश दिले की हे काम तातडीने होणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारा निधी आम्ही स्वहस्ते तुम्हांला द्यायला तयार आहोत ही सगळी चर्चा झाल्यानंतर मग ही आता जी कामे सुरु आहेत ती कामे आता मार्गी लागलेली आहेत. त्याबाबतीमध्ये मा. महासभेमध्ये जवळ जवळ एक ते दिड तास चर्चा झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुमच्याशी सहमत आहोत, तुम्ही गेला असाल तुम्ही पाठपुरावा केला असेल माझ्या काही निदर्शेनास आलेले नाही. जो केला असेल आमचे सहकार्य आहे. परंतु आमच्या विभागामध्ये गेल्या कित्येक दिवसापासुन ४८ तासांनंतरच पाणी येते त्याचे काय? दुसऱ्या विभागात २४ तासाने येते क ाही काहीनां ३० तासांमध्ये येत असेल पण आमचे काय ४८ तास फिक्स केलेले आहे. आता त्या टाकिची लेव्हल तुम्ही वाढवण्यासाठी व्हॉल कुठून कंट्रोल करु शकत नाही का? पाणी कंट्रोल करण्यासाठी ते तुम्ही करा.

**शिवाजी बारकुंड :-**

आता तेच सांगितले.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर ची एरिया आहे.आता निदर्शेनास आहे ती कमला पार्कची टाकी आणि गोडदेवची टाकी. आणि अस्मिता या स्थितीने टाक्याच्या झोन मध्ये पाणी अनियमित येते. नियमात येत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

ही माहिती आपणच दिलेली . आम्हीच दिलेली आपणाला.

**शशिकांत भोईर :-**

ह्या टाकीचे व्हॉल आहेत ते कंट्रोल करा आणि खाला दुसऱ्या टाकीचे दो आटे कमी नाही करत.

**शिवाजी बारकुंड :-**

ह्या तिन टाक्यांना अडचणी येतील ही आपल्याबरोबर चर्चा झाली . आम्हीच आपणाला माहिती दिली. त्याच्यावर तुम्ही बोललात की पुढचे काय करायचे हे तुमचे काम आहे. त्याच्यावर आज आम्ही मा. स्थायी समितीला सांगतो ते रेकॉर्ड वरती नाही. परंतु त्याचे जे प्रयोग आहेत. टेक्नीकल गोष्टी सगळ्या केलेल्या आहेत. लवकरच तो प्रस्ताव मंजुरी साठी मा. स्थायी समितीपुढे येईल. त्या तीन टाक्यासाठी प्रेशर मेंन्टन राहण्यासाठी जसे सांगितल्या प्रमाणे २.७,२.८ प्रशेर मेन्टेन राहण्यासाठी जे काही टेक्नीकल करावे लागणार आहे. तो प्रस्ताव येणार आहे.

**शशिकांत भाईर :-**

आम्ही तर सांगणार परर्सनल ची गरज नाही तुम्ही टेकनीकल ताबडतोब आजच करा. प्रस्ताव आणायची गरज काय? नंतर प्रस्ताव आणा ना. आम्ही हे केले.

**रतन पाटील :-**

साहेब, सिस्टम वैगरे बदलायची असेल तर तुम्ही करा ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही जेव्हा अवलोकन सादर करता तेव्हा आम्ही मंजुरी करता देतो. म्हणुन तुम्ही अगोदर काय करता ना ? नंतर देता ना तुम्ही, नंतर प्रस्ताव सादर करा ना.

**रतन पाटील :-**

साहेब, मा. स्थायी समिती सदस्यांनी तुम्हाला थांबवलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

रोज ५० - ६० लोक येतात पाणी नाही म्हणुन म्हणजे आपण नुसते हवेत बोलतो अशातला भाग नाही.

**शशिकांत भोईर :-**

रोज आमच्याकडे ४८ तास आहेतच पाणी दोन - दोन दिवसांनी येते.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, रोज का ताकलिफ है।

**रतन पाटील :-**

, मा. सभापती साहेब, सध्या जास्त त्रास आम्हाला बी. पी. रोड ------------- यांना जास्त आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

जिस दिन बोलेंगे ----------

**शिवाजी बारकुंड :-**

गोडदेवचा जा झोन आहे. त्याला सगळ्यात जास्त त्रास आहे. त्याच्यानंतर कमला पार्क आहे. आणि तिसरा अस्मिता आहे.

**रतन पाटील :-,**

साहेब, हा त्रास किती वर्षा पासुन आहे?

----------

किती वर्षा पासुन ------------

**शिवाजी बारकुंड :-**

जिथे तक्रार आहे आर. एन. टी आणि आशानगर तिथे टेलेड तिथे पाईप लाईन कमी आहेत. त्याचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. पण तीन टाक्यांमध्ये जी मेन अडचण आहे.गोडदंव, कमला पार्क आणि अस्मिता जसे सांगितले २.७,२.८ जे प्रेशर मेन्टन झाले तर त्यासाठी मी साहेबाच्या परवांनगी ने तिथे एक अभियंता ठेवतो की तयांने २.७,२.८ जे प्रेशर मेन्टन झाले तर तिनही टाक्यात पाणी व्यवस्थित राहते कुणीही प्रत्येक व्हॉलमनला किंवा प्रत्येक इंजिनियरला वाटते आपला एरिया पुर्ण झाला म्हणजे आपण सुटला. परंतु तिथे आता सेपरेट एक रजिस्टर ठेवुन रोजचा प्रेशर मेन्टन -------

-----------

टेलिफोन लागले का?

**शिवाजी बारकुंड :-**

आता टेलिफोनचा रिपोर्ट केलेला आहे.

--------------

संध्याकाळी दांडा वरुन फोन केला. फोन चालु झाला.

------------

साहेब, ऑफीसमध्ये गेल्यानंतर प्रेशरचया संदर्भात आम्हांला काय सांगितले जाते? तिथुन प्रेशर कमी आहे. पाटली पाड्यातुन प्रेशर कमी येते की व्हॉलमेन्टनंन मध्ये प्रेशर कमी होते? आपल्या कडे व्हॉल मेंन्टनंन मध्येच प्रेशर कमी होते.

**शिवाजी बारकुंड :-**

मी सन्मा. सदस्यांना या बाबतीमध्ये आश्वासन देवु इच्छितो की आपल्या मा. स्थायी समितीची बैठक ही प्रत्येक आठवडयाला होते. त्याप्रत्येक आठवड्याच्या बैठकीला ज्या ज्याठिकाणी पाण्याचे प्रॉब्लेम्स आहेत. त्या त्या ठिकाणचे प्रेशर मेन्टन जे करणे आवश्यक आहे किंवा किती प्रकारे झाले तर असा प्रत्येक मा. स्थायी समितीला एक स्वतंत्र्य अहवाल देण्याचे निर्देश मी कार्यकारी अभियंतांना देतो आणि प्रत्येक मा. स्थायी समितीला त्यात एक वेगळे जरी समजा अजिठांवर नसले तरी त्यांचे सक्युलेशन हे सगळे होईल.

-----------

आम्ही प्रत्येक मा. स्थायी समितीमध्ये पाण्याबद्दल बोलतच असतो. आठवड्यालाही बोलतो तरीही कही सुधारणा नाही.

------------

एक महिन्याचा जरी अहवाल दिला . मंजुर

-------------

----------

**शिवाजी बारकुंड :-**

प्रत्येक आठवड्याला तुम्हाला अहवाल देतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, प्रत्येक सभेला बोलतो, पण त्याच्यात काही सुधारणा होत नाही त्याचे काय? सुधारणा झाला पाहिजे की नाही ?प्रत्येक सभेला झाले पाणी पुरवठा बाबत प्रत्येक सभेला आमचे निवेदन असते. साहेब, तसेच मी तुम्हांला दुसरे एक निर्देशनास आणु देवु इच्छितो की, माझ्या वॉर्ड मध्ये ---------- रोड आहे तिकडे टेस्टिंगसाठी आठ दिवस झाले खोडुन ठेवलेले पण इंजिनीयर कुणालाही येईन नव्हता. मी रोज रोज मागे लागुन आठव्या दिवशी चेक केले पण तो मेस्त्री येउुन इंजिनीयरने नंतर त्या मेस्त्रीला बोलवले. मेस्त्रीने इंजिनियर ला बोलवल्यानंतर तुम्हाला फोन त्याच्य हातात दिला . ---------

---------

**शिवाजी बारकुंड :-**

मी संबधीत आधिका-यांना सुचना देतो की, ज्याठिकाणी एखादा इंजिनीअर जाउन प्रेशर चेक आवश्यक आहे त्याठिकाणी ? इंजिनिअरच गेला पाहिजे त्यासाठी त्याने वेळ ---------

-----------

निश्चित करुन द्यावी संबधीत वॉर्ड मधल्या नगरसेवकांना जर त्याठिकाणी उत्सुकता असेल नाही या ठिकाणी हे काम आपल्या नजरे समोर होणे आवश्यक असेल तसे त्यांची इच्छा असेल तर त्यांनी त्यांना बोलवावे. त्यांच्या समोर

------------

श्री. बारकुंड साहेबांनी माझ्यासमोर स्वतः निर्देश दिलेले की असे झाले पाहिजे पण कधिनाही झाले मी सांगतो की व्हॉलमेन जेव्हा पाणी सोडतात. त्या वेळास कुठे लिकेज आहे का? ते व्हॉलमेनने बघायला पाहिजे पण आजपर्यंत कधी झाले नाही. कुठलेही लिकेज आम्हांला सांगायला लागतात. इकडे लिकेज आहे. तुम्ही लिकेज काढु द्या. की प्रेशर कुठे आहे ते बघा. कधिच नाही व्हॉलमेन व्हॉल खोलला की गेला टाकीवर बसायला.

**शिवाजी बारकुंड :-**

व्हॉलमेनला याबाबतीत आपण स्ट्रीकली ------------

--------

जे इंजिनिअर आहेत ते सिव्हील इंजिनीअर आहेत. त्यांना याच्यांतले काय ज्ञान?

----------

साहेब, मी एक इजिंनिअर बाबत सांगतो. नेहमी इंजिनिअर चा मुद्दा उपस्थित केला जातो. पाणी पुरवठा, बांधकाम, नगर रचना कुठेही असु द्या साहेब हे सगळे सिव्हील इंजिनिअर असतात. या प्रत्येक जण त्या फिल्ड मध्ये गेल्यानंतर कोण समजा बांधकाम मध्ये गेला तर तो तिथे एक्सपर्ट होतो. कोण पाणीपुरवठयात गेला तर तो त्यात एक्सपर्ट होतो. तुम्ही माहिती ------------- कोणी प्लॅनिगंमध्ये गेला तर तो त्यात एक्सपर्ट होतो. सगळे बी.ई सिव्हील किंवा डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर हे सिव्हील इंजिनिअर असतात.

**कॅसेट २**

**बी साईड पान नं ४० ते ४५**

------ :-

आपल्याबरोबर कार्यरत कधीपासून आहेत? ते आतापर्यंत एक्सपर्ट झाले नाही का? आपल्याकडे कार्यरत असून अजून एक्सपर्ट झाले नाहीत का?

------ :-

तुम्ही डॉक्टर ठेवा ना.....

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही सगळ्यांच वैयक्तिक होत.

------ :-

वैयक्तिक कशाला? वैयक्तिक तुम्ही तुमच्यावर ओढून घेता. कार्यकारी म्हणून आम्ही भांडतो.

----- :-

मा. आयुक्त साहेब, शहरांमध्ये पाणी सगळ्यांना सारख्या प्रमाणांत मिळायला पाहिजे. शहरांची जी वाटप यंत्रणा आहे. ती बरोबर नाही. ती सुधारित करा. प्रत्येकाला काहींना २४ तास, काहींना ४८ तास आहेत ते बरोबर करा.

**मा. सभापती सो. :-**

आता सांगितले ना सुधारित करतील आता सांगितले ना. २.७ आहे जर २.८ जर आले तर पाणी सुरळित होईल.

**रतन पाटील :-**

साहेब, २-५ हे प्रेशर आहे, आम्हांला ४८ तास, ३६ तासांनी पाणी मिळते. काही-काहींना २४ तासांनी पाणी मिळते. ती वाटप यंत्रणा सुधरा.

(सन्मा. सदस्य श्री. रविंद्र माळी यांनी प्रकरण क्र. १८३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. त्याची अंमलबजावणी लगेच करावी.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. सभापती साहेब अपने को, चर्चा करने की है।

**मा. सभापती सो. :-**

याची अंमलबजावणी लगेच करावी.

**हंसुकूमार पांडे :-**

जो आपने लेटर दिया था, उसके बारे चर्चा करने की बोला था ना।

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. मा. आयुक्त साहेब तुम्ही, मी आणि जेन्वी अल्मेडा मॅडम, आयुक्त दालनामध्ये आणि तो चर्चमध्ये जायला किंवा शाळेमध्ये जायला विद्यार्थ्यांना जो त्रास होतो. रस्ता क्रॉस करण्यासाठी तर मी, सिग्नलबाबत सांगितले होते. पण त्याची अजून काही कारवाई झाली नाही.

----- :-

स्पीड ब्रेकरही

**ग्रिटा फॅरो :-**

श्री. खांबित साहेब ह्याचे मला उत्तर द्या.

**रोहिदास पाटील :-**

स्पीड ब्रेकरला अलाऊड नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

...... नाही मग. सिंग्नलची व्यवस्था करा. तुम्ही काय म्हणालात, आम्ही सिंग्नल पण करुन देवू. कारण पालक लोक आम्हांला पकडतात आम्ही चर्चमध्ये जातो. आम्हांला पालक लोक सारखे प्रश्न विचारत असतात. हे काम किती दिवसांत होणार याच्यावर मला आज उत्तर पाहिजे. इथेच का म्हणून होत नाही? आमच्या शाळेजवळ टाकायला तुम्हांला सर्व कायदे असतात.

**दिपक खांबित :-**

नविन टाकायचे...

**ग्रिटा फॅरो :-**

असू द्या. कायदे नको.

**मा. सभापती सो. :-**

स्पिड ब्रेकर नविन जुनी कुठलीही ऑर्डरर्स आहेत काढायचे आहेत.

**दिपक खांबित :-**

काढायचे आहेत.

**मा. सभापती सो. :-**

मग ते का नाही काढले?

**दिपक खांबित :-**

जे शासकिय निकषाप्रमाणे आहेत ते काढायचे नाहीत.

**मा. सभापती सो. :-**

असा काहीच उल्लेख नाही.

------- :-

डमरल टाका छोटी-छोटी.

**एस. ए. खान :-**

शासकिय नियमाप्रमाणे स्पिड ब्रेकरला डिझाईन द्या. शासकियप्रमाणे कसली आहे. त्याची डिझाईन करा. आणि डिझाईन प्रमाणे बनवा. किती ॲक्सीडेंट होतात.

**ग्रिटा फॅरो :-**

त्यादिवशी चर्चमध्ये जाताना मुलांचा ॲक्सीडेंट झाला असता. एका म्हातारीचा पण त्यादिवशी, साहेब जर तुम्हांला असे वाटत असेल की कोणाचा तरी तिकडे ॲक्सीडेंट झाला पाहिजे.

------ :-

शासकियप्रमाणे काय आहे ते डिझाईन करा ना।

**दिपक खांबित :-**

**ग्रिटा फॅरो :-**

स्कूलच पण पत्र आलेले आहे.

**दिपक खांबित :-**

असे नाही करता येत.

**ग्रिटा फॅरो :-**

तुम्ही काहीही करा पण कराच. सिग्नल टाका.

**दिपक खांबित :-**

सिग्नलसाठी ट्रॅफीक पोलिसांची मंजूरी लागते आणि ते अशा स्पॉटला देणारच नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

सिग्नल पण टाकता येत नाही. मग, काहीतरी तुम्ही करा. फलक लावता येतात ना, मग फलक लावा.

**दिपक खांबित :-**

फलक लावून देतो.

----- :-

मा. आयुक्त साहेब किरण नगर नाले का, जो अपना काम पास होके रखा है, उसको अभीतक आपने मंजूरी दिया नही। उसको मंजूरी दे दो। किरणनगर नाला बडा है। उसके गटर के उपर स्लॅब डालने का है।

**रतन पाटील :-**

कॅन्टीनच्या संदर्भात माहिती द्या. कॅन्टीनचे काय का बंद आहे?

**हंसूकूमार पांडे :-**

पाणी पुरवठा मे आप जो लॉस दिखा रहे थे, उसके बारे मे बोल रहा था। पाणी पुरवठा में लॉस कैसा है। परचेस ४ रु. में से ७ रु. में , २८ रु. में, ३२ रु. में, फिर पानी पुरवठा मे लॉस कैसा?

**शिवाजी बारकुंड :-**

आपलं पत्र प्राप्त झालेले आहे. आणि त्याच्यावर सविस्तर टेक्निकल आपण जे पत्रात मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याला उत्तरही देतो. आणि पुढच्या मा. स्थायी समितीसमोर त्याबाबत माहितीही देतो.

**सभा संपल्याचे वेळ :- दूपारी २.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**